महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# सृजन

एप्रिल - जून २०२२

## वर्ष विक्रमांचे...
## ...उत्तुंग कामगिरीचे



## महानिर्मितीच्या विक्रमी कामगिरीबद्दल मा. ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत ह्यांच्या हस्ते सर्व संचालकांचे अभिनंदन




दिनांक ११ मे रोजी महानिर्मितीने आपल्या कामगिरीत सातत्य राखत पुन्हा एकदा सर्वच्या सर्व २७ औष्णिक वीजनिर्मिती संच कार्यान्वित करुन त्यातून वीजनिर्मिती साध्य करण्यात यश मिळविले. महानिर्मितीच्या या विक्रमी कामगिरीबद्दल मा. ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत ह्यांनी महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे, संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे आणि संचालक (माईनिंग) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव तसेच वरिष्ठ व्यवस्थापन आणि सर्व अभियंते-तंत्रज्ञ यांचे अभिनंदन केले.







## महानिर्मितीचा १७वा वर्धापन दिन मुख्य सांघिक कार्यालय प्रकाशगड येथे उत्साहात साजरा





महानिर्मितीच्या १७व्या वर्धापन दिनी राज्यातील विविध वीज केंद्रामधील मुख्य अभियंते, अधिकारी-कर्मचारी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सदर कार्यक्रमात सहभागी झाले होते. तसेच यावेळी कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) श्री. नितीन वाघ यांचे मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाने तयार केलेल्या "रसायनशास्त्र" पुस्तिकेचे प्रकाशन आणि महानिर्मितीच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या सुधारित व पुनर्रचना केलेल्या महानिर्मितीच्या संकेतस्थळाचे उद्घाटन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.








अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## मनोगत

नुकताच संपन्न झालेला महानिर्मितीचा यावर्षीचा सतरावा वर्धापन दिन हा आपल्या अलीकडच्या विक्रमी दैदिप्यमान कामगिरीमुळे अविस्मरणीय असा झाला असून ही कामगिरी आपल्या सहकार्यांनेच शक्य झालेली आहे, याबद्दल मी आपणा सर्वांचे अभिनंदन करतो. महानिर्मितीच्या आजवरच्या ६० वर्षांच्या इतिहासातील आजवरची सर्वोत्तम विक्रमी कामगिरी नोंदवून आपण सर्वांनी प्रयत्न व अथक परिश्रम यांच्या माध्यमातून या यशोगाथेद्वारे कामगिरीचे नवे मापदंड निर्माण केले आहेत. महानिर्मितीने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ५४,४७७ दशलक्ष युनिट्स इतकी एकूण वीजनिर्मिती करुन ऐतिहासिक उच्चांक गाठला आहे. तसेच वर्ष २०२२-२३ मध्ये आत्तापर्यंत म्हणजे जून अखेरीस मागील तिमाहीच्या पेक्षा या तिमाहीच्या वीज निर्मितीत १०.३५% इतकी वाढ झाली.

कसोटीच्या प्रसंगी आपण आपली कामगिरी कशी उंचावतो यावरच आपल्या आणि पर्यायाने आपल्या संस्थेच्या प्रगतीचा आलेख रेखाटला जात असतो. एकीकडे देशभरात सर्वत्र कोळसा टंचाई आणि दुसरीकडे यावर्षीचा तीव्र उन्हाळा आणि त्यानुसार राज्याची वाढलेली विजेची मागणी अशा तिहेरी आव्हानात्मक परिस्थितीमध्ये या उन्हाळ्यात आपण सातत्यपूर्ण उच्चतम विक्रमी कामगिरी करण्यात यश मिळवले आहे. औष्णिक वीज निर्मिती केंद्रे ही आपली बलस्थाने आहेत. त्यामुळे औष्णिक संचांची उपलब्धता १००% असावी यासाठी आपण सतत प्रयत्नशील असतो. प्रसंगी आपण आपले सर्वच्या सर्व २७ औष्णिक संच कार्यान्वित ठेवत ऐतिहासिक कामगिरी साध्य केली आहे. याचबरोबर राज्य शासनाच्या मार्गदर्शनानुसार महानिर्मितीने 'मिशन ८,००० मेगावॅट" अंतर्गत औष्णिक संचांमधून ८,००० मेगावॅटचा टप्पा पार करण्यात यश मिळवले आहे. यावर्षीच्या मे महिन्यात आपण उच्चतम मासिक वीजनिर्मितीचेही काही नवे विक्रम नोंदविले आहेत. आपल्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राने वर्ष २०२१-२२ मध्ये १०,८४८ दशलक्ष युनिट्स इतकी महत्तम वार्षिक वीजनिर्मिती साध्य केली. तर ३×६६० मे.वॅ. संचांमधून मे २०२२ मध्ये १,१९२ दशलक्ष युनिट्स इतकी मासिक वीजनिर्मिती साध्य करीत आजवरची विक्रमी कामगिरी केली आहे. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रानेही अतिशय मोलाची कामगिरी बजावत सलग २३ दिवस तेथील सातही संचांमधून अखंड वीजनिर्मिती साध्य करीत आजवरची विक्रमी कामगिरी केली आहे. दिनांक १ एप्रिल ते २५ एप्रिल २०२२ या काळात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राने एकूण १,३३४ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मिती केली असून अखंड वीजनिर्मितीतील चंद्रपूर महाऔष्णिक वीजकेंद्राची ही आजवरची विक्रमी कामगिरी आहे. इंधन व्यवस्थापनातही प्राप्त कोळसा रेक्सचे प्रमाण - उपलब्ध झालेला कोळसा यांतही सर्वोच्च कामगिरी आपण नुकतीच नोंदविलेली आहे. एकीकडे औष्णिक संच सर्वोत्तम कामगिरी करीत असताना आपल्या कोयना जल विद्युत केंद्राने देखील या काळात आजवरची विक्रमी कामगिरी नोंदवून राज्यातील वीजग्राहकांना विशेषत: शिखर मागणीच्या काळात मोठा दिलासा दिलेला आहे.

अर्थात कोणतीही विक्रमी कामगिरी ही सहजसाध्य नसतेच. तीन कलमी कार्यक्रमानुसार अवलंबलेली उत्तम कार्यसंस्कृती, वीज संचांच्या देखभाल-दुरुस्तीचे काटेकोर नियोजन, सुरक्षितता, पर्यावरणाबाबत दक्षता आणि हे सर्व नियोजनानुसार करण्यासाठी आपसातील समन्वय राखून आपल्या सर्वांचे सामुहिक योगदान यामुळेच आपण हा टप्पा पार करू शकलो आहोत.

पर्यावरणीय दृष्टीकोनातून अपारंपारिक ऊर्जा निर्मितीबाबत महानिर्मितीने या वर्षी ७५ मेगावॅट क्षमतेचे ७ सौर प्रकल्पांचे कार्यान्वयन केले असून स्थापित क्षमता वृद्धी करण्याच्या दृष्टीकोनातून २,७६३ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणीचे कार्य प्रगतीपथावर आहे. महानिर्मितीतर्फे ग्रीन हायड्रोजनवर आधारित प्रकल्प तसेच पंप स्टोरेज, जल विद्युत प्रकल्प उभारणीचे आपण नियोजन करीत आहोत. आगामी महत्वाकांक्षी सौर ऊर्जा कार्यक्रमाअंतर्गत एकूण २५०० मेगावॅट क्षमतेच्या अल्ट्रा मेगा सौर पार्कसाठी महानिर्मिती व मे. एन.टी.पी.सी. यांची संयुक्त कंपनी स्थापण्यास राज्य शासनाने नुकतीच मान्यता दिली असून यांतील महानिर्मितीचा वाटा १,२५० मेगावॅट इतका असणार आहे. कोविड-१९ च्या काळात मजुरांच्या स्थलांतरामुळे भुसावळ येथे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ६६० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम काही प्रमाणात बाधित झाले होते. तथापि, त्यानंतर आता मात्र अत्यंत गतिमानतेने हा प्रकल्प पूर्णत्वाकडे जात आहे. तसेच आधुनिकीकरण व नूतनीकरण माध्यमातून उरण वायु केंद्राची वीजनिर्मिती क्षमता वाढविण्यासाठी देखील आपली प्राथमिक तयारी सुरु आहे.

एकूणच महानिर्मितीने गेल्या वर्ष-दोन वर्षांतील आव्हानात्मक परिस्थितीत जी सर्वांगीण विक्रमी व सातत्यपूर्ण कामगिरी बजावली, त्याची योग्य ती दखल विविध पातळीवर घेण्यात आलेली असून प्राप्त विविध मानाच्या पुरस्कारांनी आपल्याला नव्याने प्रोत्साहित केले आहे. यावर्षी पर्यावरण संवर्धन, सुरक्षितता तसेच जल व्यवस्थापन आणि प्रशिक्षण व मानव संसाधन, सामाजिक कामगिरी याकरिता आपल्या कंपनीच्या सर्वांगीण प्रयत्नांसाठी आपणांस अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, परळी औष्णिक विद्युत केंद्र, उरण वायु विद्युत केंद्रास या संदर्भात नुकतेच आणखी काही पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. अर्थात पुरस्कारप्राप्तीनंतर आपली जबाबदारी वाढते याचे भान ठेवून ही विक्रमी घौडदौड अशीच अविरत पुढे चालू ठेवण्याकरिता आपण सर्व अखंड ऊर्जेने प्रयत्नशील राहुयात.

- संजय खंदारे

# महानिर्मितीच्या १७व्या वर्धापन दिनी उत्कृष्ट कामगिरीचे राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान














महानिर्मितीच्या १७व्या वर्धापन दिनी राज्यस्तरीय आंतर विद्युतकेंद्र पुरस्कार सोहळ्यामध्ये विशेष उल्लेखनीय कार्य करणारे विभाग व तंत्रज्ञ यांना गौरविण्यात आले. यांत्रिकोत्तम, शक्तीपुंज, उत्कृष्ट गुणवत्ता मंडळ व विश्वकर्मा असे पुरस्कारांचे स्वरूप होते तर उत्कृष्ट कोळसा हाताळणीकरिता ब्लॅक डायमंड पुरस्कार प्रदान करण्यात आले. सन २०१८ ते २०२१ करिता घोषित झालेले पुरस्कार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - १) मा.श्री. राजेश मोराळे व कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) मा.श्री. अभय हरणे यांनी कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वीकारले. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.









# महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित


वर्ष १७ वे (अंक ५)

एप्रिल - जून २०२२


# Maharashtra State Power Generation Company Limited
## APRIL - JUNE - 2022


## संचालक मंडळ

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक : श्री. संजय खंदारे (भाप्रसे)

संचालक : श्री. दिनेश वाघमारे (भाप्रसे)

संचालक (संचलन) : श्री. चंद्रकांत थोटवे

संचालक (माईनिंग) : श्री. पुरुषोत्तम जाधव

संचालक (प्रकल्प) : श्री. व्ही. थंगपांडियन

संचालक (वित्त) : श्री. बाळासाहेब थिटे

संचालक (मा.सं.) : डॉ. मानवेंद्र रामटेके

संचालक : श्रीमती. स्वाती व्यवहारे


## अनुक्रमणिका


| अनुक्रमणिका | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|
| डोंबाऱ्याचे व्यवस्थापन | संजय कुलकर्णी | ३ |
| अच्छे दिन | डॉ. अतुल बनसोड | ७ |
| फक्त एक पृथ्वी... | राजेश अंबादास पवार | १३ |
| स्माईल प्लीज | नितीन जोगळेकर | १५ |
| पता है ? मेरा बाप कौन है ? | संतोष पुरोहित | २३ |
| Utilization of Sugarcane Dry Pressmud as a Fuel at Thermal Power Plants (Part - II) | Sanjay Kurhade | २८ |

## काव्यकुंज

१७ ते १९

**सहभाग :-** राजेश पवार, राजेश वऱ्हाडे, सागर सरागे, सोनिया भागवत केळकर, प्रविण भोईर, नमिता काणेकर,

**सेवानिवृत्ती / निरोप** १६

**महानिर्मितीचे कर्मयोगी / आपण यांना अंतरलो** ६

## प्रशासकीय वृत्त

**पृष्ठ क्र. : ५ ते १२, १४, १६, २० ते २२, २४ ते २७, ३२**



संपादक : **महेश आफळे**
जनसंपर्क अधिकारी (महानिर्मिती)

संपादन सहाय्य : **संतोष पुरोहित**

**मालकी**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.**
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई

**श्री. महेश गोविंद आफळे** यांनी
कार्यालय - **हेमा आर्टस्**
१२१, सागर, प्रभात इंडस्ट्रीयल इस्टेट,
दहिसर चेकनाक्याजवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८ येथे छापून
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई येथे प्रसिध्द केले.

**(खाजगी वितरणाकरिता)**



**The Company accepts no responsibility for the matter published in the Journal.**



**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
संपादक, सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
दुसरा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : pro@mahagenco.in
संकेतस्थळ : www.mahagenco.in

# संपादकीय....

'सृजन' च्या अंकात आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत. क्षेत्रीय कार्यालयांना वारंवार आवाहन करुनही पुरेसा व सकस मजकूर 'सृजन' साठी प्राप्त होण्यात अद्यापही अपेक्षित प्रतिसाद मिळताना दिसत नाही, त्यामुळे अंक प्रसिध्द होण्यास विलंब होतो. एकूणच समाजाची मानसिकता समाजमाध्यमांच्या अवास्तव प्रभावामुळे 'सारे काही मोबाईलवरच हवे' या सदृश झालेली बघायला मिळत असल्याने छापील मजकूर वाचण्याकडे कल कमी होत चालला आहे, हे वास्तव आता स्वीकारायला हवेय. 'आजादी का अमृत महोत्सव' या १५ ऑगस्टला पूर्ण होत आहे. महानिर्मितीने त्यानिमित्ताने विविध खुल्या स्पर्धांचे आयोजन केलेले होते व त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. यापुढील 'सृजन' चा 'जुलै-ऑगस्ट २०२२' चा अंक हा बहुधा शेवटचा अंक म्हणून प्रसिध्द होणार असून त्यात महानिर्मितीची या वर्षातील विक्रमी यशोगाथा व विविध स्पर्धा-पारितोषिक वितरण-पुरस्कारप्राप्त निबंध इ. चा समावेश असणार आहे.

'सृजन' च्या या अंकात मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मनोगतातून आपल्या सर्वांच्या सामूहिक योगदानाबद्दल सर्वांचे मनापासून कौतुक केलेले आहे. खरोखरच या वर्षाच्या कालावधीत आपण त्यांचे मार्गदर्शनाखाली विविध आव्हानांचा यशस्वी मुकाबला करत सातत्यपूर्ण विक्रमी कामगिरी साध्य करु शकलो ही महानिर्मितीसाठी गौरवाची बाब आहे. या विक्रमी कामगिरीची विविध प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल या अंकात समाविष्ट आहे.

अंकातील ललित लेखनात संजय कुलकर्णी, अतुल बनसोड, संतोष पुरोहित यांचे लेख वाचनीय व अंतर्मुख करणारे आहेत. संजय कुऱ्हाडे यांच्या वेगळ्या विषयावरील तांत्रिकी लेखाचा दुसरा व अंतिम भाग या अंकात आहे. यापुढील काळात वीजक्षेत्रात अशा नावीन्यपूर्ण प्रयोगांचीच गरज भासणार आहे. अन्य प्रशासकीय वृत्त-छायाचित्रे यांनीही हा अंक भरगच्च सजलेला असून महानिर्मितीच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने अंकाचे समर्पक मुखपृष्ठ तयार करण्यात आले आहे.

सर्वांनी अंकाचा अवश्य आस्वाद घ्यावा, ही विनंती.

**- महेश आफळे**

# डोंबाऱ्याचे व्यवस्थापन

- संजय कुलकर्णी,
कार्यकारी अभियंता (मध्यवर्ती खरेदी विभाग) गट-२,
मुख्यालय, मुंबई




शीर्षक थोडे जगावेगळे आहे, पण चिंतनीय निश्चितपणे आहे. आपण निरनिराळ्या अभ्यासक्रमातून management म्हणजे व्यवस्थापनाचा अभ्यास करतो, लाखो रुपये खर्च करून IIM तसेच परदेशातील नामांकित शिक्षणसंस्थातून याचा अभ्यास केला जातो व यशस्वी विद्यार्थ्यांना लाखो करोडो रुपयांची packages मिळतात.

आपण मुंबईच्या डबेवाल्यांचे व्यवस्थापन अभ्यासतो व जगभरात ते प्रसिद्धही होते, काही वर्षांपूर्वी श्री लालूप्रसाद यादव रेल्वे मंत्री असताना त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचे जगभर कौतुक झाले होते.

मात्र मी पाहिलेले, अनुभवलेले डोंबाऱ्याचे व्यवस्थापन उल्लेखनीय व आगळंवेगळं आहे कारण येथे कुठले कॉलेज नाही, कुठलेही प्रशिक्षण नाही तर हे प्रत्यक्ष on the job स्वत: आत्मसात करण्याचे व्यवस्थापन आहे. खरंच हा थट्टेचा विषय नाही तर चिंतनाचा आहे.

चुनाभट्टी स्टेशनवरून सकाळी ८.४७ ची वडाळा रोड लोकल पकडण्याचा माझा नित्यक्रम. वडाळा रोड स्थानकावर फलाट क्रमांक ३ वर उतरल्यावर फलाट क्रमांक १ वर जाण्यासाठी escalator वर एकदमच झुंबड उडते, मी मात्र निवांतपणे गर्दी कमी होण्याची वाट पाहत उभा राहतो, मुंबईचीच गर्दी ती, एका मिनिटात कमी होऊन परत पुढच्या मिनिटाला परत वाढते. माझ्यासोबत एक डोंबाऱ्याचे कुटुंबही थोडा वेळ गर्दी कमी होण्याची वाट पाहत थांबलेले असते.

कुतूहलाने मी त्यांचे निरीक्षण करत असतो. कुटुंबप्रमुखाकडे एक श्रावण बाळासारखी कावड असते, त्या कावडीच्या दोन्ही पारड्यात खूप अवजड गाठोडी असतात. कदाचित त्यांच्या खेळाची साधनं असावीत किंवा संसाराची गाठोडी, म्हणतात ना विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर. कुटुंबाची लक्ष्मी, कपाळावर ठसठशीत रुपयाच्या आकाराचे कुंकू, चिप्प तेल लावून घातलेली वेणी, खांद्यावर मजबूत व भरीव साधारणत: ७ ते ८ फूट लांबीचे ४ ते ५ बांबू लिलया पेललेले आणि गळ्यात एक झोळी त्यात ८ ते १० महिन्याचे लेकरू - एवढ्या कोलाहलात निवांत झोपलेले असते तर कधी कधी इवल्या इवल्या डोळ्यांनी कुतूहलाने सर्वत्र टुकुमुकु पाहात असते आणि हो येथेच त्याच्या व्यवस्थापन अभ्यासाचा श्रीगणेशा होत असतो.

या कुटुंबासोबत असतात आणखी दोन चिमुरडी, एक चुणचुणीत ८ ते ९ वर्षांची मुलगी, हातात स्टील ची मोठी रिंग. सतत ती रिंग गळ्यात घालते आणि परत हातात घेत बिनधास्तपणे बागडत असते, सोबत ५ ते ६ वर्षांचा चिमुरडीचा भाऊ असतो, त्याच्या गळ्यात एक ढोलक व त्याला वाजवण्यासाठी काड्या (स्टिक्स), तोंडाने लॉलीपॉप चोखणे सुरु. असे हे पंचकोनी कुटुंब.

escalator वरची गर्दी कमी होताच ही मंडळी पटकन पुढे सरकते आणि त्यावर उभी राहते, कोणी कोणाला बोलवत नाही की, चला... चला म्हणत नाही, त्यांचे synchronization एकदम परफेक्ट असते. संसाराची अवजड कावड लिलया पेलत कुटुंब प्रमुख पुढे असतो, त्याच्या मागे दोन भावंडं व शेवटी लहान बाळासहित लक्ष्मी, खांद्यावर अवजड बांबूचे ओझे पेलून व कोणालाही ती लागणार नाहीत याची काळजी घेत ... what a perfect movement.

वडाळा रोड स्थानकावरून ९.०८ ची वांद्रे ला जाणारी लोकल पकडून मी वांद्रे स्थानकावर उतरतो. सकाळी १० ते संध्याकाळी ६.१५ पर्यंत ऑफिस... संध्याकाळी ६.३४ ची CSMT ला जाणारी लोकल पकडण्याचा माझा प्रयत्न असतो. संध्याकाळी वांद्रे स्थानकाबाहेर सकाळी भेटलेले डोंबाऱ्याचे कुटुंब आपला खेळ करत असते. दोन बांबू एकमेकाला तिरकस बांधून दोन टोकांना उभे केलेले असतात व त्या दोन टोकांमध्ये एक तारवजा दोरी बांधलेली असते आणि त्या दोरीवरून जमिनीपासून ८ ते १० फुटाच्या अंतरावरून ती चिमुरडी मुलगी कुठल्याही आधाराविना चालत असते, हातात एक बांबू आडवा धरलेले तोल सांभाळण्यासाठी.

हे सर्व अनुभवणे हा माझा नित्यक्रम झाला आहे. नकळत मी माझ्या बालपणाची, माझ्या मुलांची व माझ्या संसाराची या डोंबाऱ्याच्या कुटुंबाशी तुलना करू लागलो आहे, यातून गवसली ती डोंबाऱ्याची management theory.

या कुटुंबातील synchronization किती परफेक्ट आहे बघा. बिऱ्हाड पाठीवर घेऊन निघालेलं कुटुंब, ७ ते ८ महिन्याच्या बाळापासून ते

कुटुंबप्रमुखापर्यंत कामाची विभागणी झालेली, कुठेच गोंधळ नाही गैरसमज नाही, कार्यालयीन भाषेत म्हणायचे तर "responsibilities are clearly defined". कोणी कुठले ओझे उचलायचे, कोणी पुढे चालायचे तर सर्वात शेवटी कोण, स्टेशनवर movement कशी करायची आधीच ठरलेले. पुढे कुटुंब प्रमुख, मध्ये बच्चा पार्टी आणि शेवटी लक्ष्मी... Perfect Co-ordination...

खेळ सुरु असतानाही ते ७ ते ८ महिन्याचे बालक शांतपणे झोपलेले असते किंवा कुतूहलाने खेळ पाहात असते... विनातक्रार. म्हणूनच सुरुवातीलाच मी म्हटले आहे कि, याच वयात व्यवस्थापन अभ्यासाचा श्री गणेशा झालेला असतो... Co-operation and Understanding...

सगळ्यात महत्वाचा अभ्यास तारेवर चालणाऱ्या चिमुरडीचा आहे... कसे बघा ती focused आहे, तिचे target defined आहे आणि ते प्राप्त करण्यासाठी ती committed आहे, ती self sufficient आहे dependant नाही, responsible आहे, motivated आहे. येतंय का लक्षात ? आपण क्रमश: चर्चा करू,

१) Focussed – तारेवरून चालतांना ती दुसऱ्या टोकाकडे यशस्वीपणे पोहोण्यासाठी Focussed आहे, एकाग्रपणे मार्गक्रमण करते आहे.

२) Target Oriented –चिमुरडीचे target defined आहे, ते म्हणजे तारेचे दुसरे टोक. कुठलाही गोंधळ म्हणजे confusion नाही.

३) Commitment –ती Focussed आहे, टार्गेट फिक्स आहे आणि ते ती प्राप्त करणारच आहे ..म्हणूनच ती committed आहे.

४) Self Sufficient – तारेवर ती स्वत:चा अनुभव व कौशल्य यांच्या भरवशावर कुठलाही आधार न घेता चालते आणि कुटुंबाच्या उत्पन्नाचा आधार बनते आहे . आर्थिकदृष्ट्या ती परावलंबी नाही.

५) Motivation -Self Motivation – तारेचे जवळ येणार टोक त्या चिमुरडीला Self मोटिवेशन देते आहे, तर आईच्या झोळीतील निरागस बालकांचे हास्य तिच्यासाठी external motivation ठरते आहे.

आहे ना त्या बालिकेने आत्मसात केलेली Management Theory... आणि तिचा management गुरु आहे तिचा पिता... कुटुंबप्रमुख, निरक्षर पण आपल्याच विद्यापीठाचा कुलगुरू...

व्यवस्थापनाचे ४ तत्व (Principles of Management) त्याने व कुटुंबाने जन्मत:च आत्मसात केलेले आहेत.

१) Planning – हो उद्याचा खेळ कधी, कुठे व कसा करायचा जेणेकरून जास्तीत जास्त पैसे मिळतील हे त्या कुटुंबाचे आधीच ठरलेले असते. प्लॅन केलेले असते.

२) Organizing – पाच जणांचे कुटुंब. सोबत बिऱ्हाड , डोक्यावर छप्पर नाही, बँकेत खाते नाही, कुठेलेही शिक्षण नाही, कुठलाही विमा नाही पण सगळे कसे organized एकीने.

३) Coordination – पाच सदस्यांचे synchronization. खेळात असो किंवा स्टेशनवरून ओझी वाहताना.. perfect coordination. जबाबदाऱ्या ठरलेल्या. कुठलेही confusion नाही.

४) Directing – कुटुंबातील सर्व सदस्यांना योग्य त्या directives दिलेल्या आहेत. कुटुंबप्रमुख तोंडाने जनतेशी संवाद साधून त्याना आकर्षित करून बिदागी गोळा करतो आहे. माऊली गळ्यातले ढोलक वाजवून रस्त्याने जाणाऱ्यांचे लक्ष वेधते आहे आणि त्यासोबतच तारेवर चालणाऱ्या चिमुरडीला प्रोत्साहनही देते आहे. लहान मुलगा स्टीलच्या रिंग सोबत छोट्या–मोठ्या कसरती करून खेळाची रंगत वाढवतो आहे.

नकळत मी त्या कुटुंबाची व आपल्या सध्याच्या जीवनशैलीची तुलना करू लागलो. आमची मुलं खरंच इतकी स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर आहेत ? मुळीच नाहीत. ती पूर्णपणे परावलंबी असून शारीरिक व मानसिकदृष्ट्या कमकुवत आहेत. आजची सदोष शिक्षणपद्धती याला मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. ७ ते ८ वर्षांची बालिका आत्मनिर्भर आहे तर त्याच वयोगटातील आमची बालकं जंकफूड खाऊन सुस्तावली आहेत. आपणही त्यांना गुंतवून ठेवण्यासाठी नको त्या सुविधा देऊन आपली खरी जबाबदारी टाळून जबाबदारी पूर्ण केल्याचा आव आणण्यात व्यस्त आहोत, भौतिक सुखात मग्न आहोत.

डोक्यावर छप्पर नसलेले ते कुटुंब पुण्या–मुंबईत तीन–तीन फ्लॅट असणाऱ्या आमच्यापेक्षाही सुखी आहे. अर्धपोटी राहूनही ते कुटुंब मधुमेह, उच्च रक्तदाब, डिप्रेशन, हृदयविकार यांसारख्या आजारांपासून मुक्त आहेत. मात्र आम्ही सलाड खाऊन, महागडी फळं खाऊन भरल्या पोटी या आजारांच्या विळख्यात सापडलो आहोत.

ढोलाच्या तालावर ते कुटुंब पोटासाठी कसरती करते आहे तर आम्ही संगीताच्या तालावर झुंबा करत श्वासासाठी, जगण्यासाठी संघर्ष करतो आहोत.

तुम्ही म्हणाल मग काय आम्ही पण डोंबारी व्हायचे का ? तर मुळीच नाही. मात्र आमच्या या नवीन पिढीला हा जगण्याचा संघर्ष, ही कसरत आत्मसात करणे गरजेचे आहे आणि हे डोंबाऱ्याचे management आम्हा सगळ्यांना आत्मसात करणे गरजेचे आहे. सगळेच विनासायास न देता त्यासाठी कष्ट करण्याची तयारी ठेवणे गरजेचे आहे. प्राप्त परिस्थितीत न डगमगता संघर्ष करत पुढे जाणे गरजेचे आहे आणि यात पूर्ण कुटुंबाची भूमिका महत्वाची आहे, त्यांच्यात समन्वय, सुसंवाद असणे आवश्यक आहे.

डोंबाऱ्याचे व्यवस्थापन ही फक्त एक संकल्पना आहे, मात्र ती योग्यरित्या आत्मसात करून नव्या पिढीचे जीवन आत्मनिर्भर बनविणे निश्चितपणे आपल्या हाती आहे.

******

## उजनी जल विद्युत केंद्राची वार्षिक देखभालीची कामे यशस्वीरित्या संपन्न

उजनी ज.वि.केंद्र (१×१२ मेगावॅट) हे भीमा नदीवर बांधण्यात आलेल्या उजनी धरणाच्या (क्षमता १२३ टी.एम.सी.) पायथ्याशी आहे. भीमा नदी, जी पश्चिम घाटाच्या भिमाशंकर येथून उगम पावते आणि तिच्या उपनद्या आणि नाल्यांनी भीमा खोरे बनवते. तिच्यावर बावीस धरणे बांधली गेली आहेत त्यापैकी उजनी धरण हे नदीवरील टर्मिनल धरण असून सर्वात मोठे धरण आहे. या धरणात पोहोचणारे पाणी थेट पुण्याच्या मुळा, मुठा, पवना, इंद्रायणी, घोड व कुकडी सारख्या अनेक नद्यांमधून येते. या जलाशयातील पाण्याचा पुणे, सोलापूर आणि अहमदनगर या तीन जिल्ह्यांतील शेतीला भरपूर फायदा झाला आहे. उजनी धरण पाणलोट क्षेत्रामुळे सोलापूर, उस्मानाबाद अशा कमी पर्जन्यवृष्टी असलेल्या जिल्ह्यांना पिण्यासाठी वर्षभर पाणीपुरवठा होईल एवढा पाणीसाठा उजनी धरणामध्ये असतो. सोलापुर शहरापासून १०० कि.मी. व पुणे शहरापासून १४० कि.मी. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वर भीमानगर येथे हे वीज केंद्र आहे. हे वीज केंद्र जनरेशन, पंपिंग व कंडेन्सर अशा तिन्ही मोडवरती चालविता येते.

मे. फुजी इलेक्ट्रिक कंपनी मर्यादित, जपान (M/S Fuji Electric Co. Ltd., Japan) यांनी एप्रिल १९९४ साली हा प्रकल्प पूर्णत: बांधून, कार्यान्वित करून जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांना सुपूर्द केला. दिनांक १५ ऑक्टोबर १९९७ रोजी हा प्रकल्प जलसंपदा विभागाने तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे संचलन व परीक्षणाकरिता हस्तांतरित केला. सन २००६ साली म.रा.वि. मंडळाच्या विभाजनानंतर उजनी जल विद्युत केंद्र महानिर्मितीकडे संचलन व परीक्षणाकरिता हस्तांतरित करण्यात आले.

सन १९९४ पासून २७ वर्षामध्ये प्रथमच उजनी जल विद्युत केंद्राचे दुरुस्तीचे (Capital overhaul) चे काम सुरु करण्यात आले होते. काम चालू असतांना महत्वाच्या पार्टसचे परीक्षण व दुरुस्ती करण्यात आली. उजनी ज.वि.केंद्र हे विहिरीच्या आकाराचे अर्धबाह्य बांधकाम असल्याने जनरेटर रोटर (वजन ४४ टन), मेन शाफ्ट (वजन ९.५ टन) व त्यासंबंधित पार्टस् वेगळे करून पॉवर हाऊसच्या वरील बाजूस (अंतर ८० फुटवर) क्रेनने उचलून ठेवण्यात आले व त्याची देखभाल करण्यात आली.

दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी जनरेटर रोटर लोवरिंग ॲक्टीविटीचे नियोजन अधीक्षक अभियंता (नवीकरणीय उर्जा मंडळ, पुणे) श्री. संजय कुन्हाडे व कार्यकारी अभियंता (भाटघर विभाग) श्री. सुनील वाळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. नियोजनानुसार सकाळपासूनच तयारी सुरु झाली, टर्बाईन पिट / जनरेटर पिट मध्ये साफसफाई तसेच योग्य ती तयारी करून रोटर लोवरिंगचे काम सकाळी १०.०० वाजता अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत सुरु केले व सकाळी ११.३० च्या सुमारास जनरेटर रोटर (वजन ४४ टन) पूर्वस्थानी बसविण्यात आले.

रोटर लोवरिंग ॲक्टीविटी पूर्ण झाल्यानंतर रोटर सेंटरिंग (Centering), अलायमेंट (Alignment) व बॅलसिंग (Balancing) चे काम घेण्यात आले तसेच लुब ऑईल सिस्टम (Lube Oil System), कुलिंग वॉटर सिस्टम (Cooling Water System), एअर डिप्रेशन सिस्टम (Air Depression System), सपोर्टिंग ऑक्जिलिअरीज (Supporting Auxiliaries) ची दुरुस्ती व देखभालीचे कामे करण्यात आली. सदर दुरुस्ती (Capital Overhaul) च्या कामामुळे तेथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मशीनची अंतर्बाह्य माहिती मिळाली व विशेष अनुभव आला.

सर्व COH कामे व ऑक्जिलिअरीज सिस्टमच्या चाचण्या आटोपल्यानंतर, दिनांक ०४ मार्च २०२२ रोजी उजनी जल विद्युत केंद्रामधून यशस्वीरित्या १२ मेगावॅटने वीजनिर्मिती सुरु करण्यात आली. वीजनिर्मिती सुरु करण्यापूर्वी (कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग, पुणे) श्री.अभ्यंकर यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. दिनांक १६ मार्च २०२२ रोजी पहाटे ०२.३० वाजता LD KALWA यांच्या संगनमताने उजनी प्लांटची उदंचन (Pumping) मोड व Synchronous Condenser मोडवर सुद्धा यशस्वीरित्या चाचण्या घेण्यात आल्या.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात ५१ वा राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षितता सप्ताह उत्साहात साजरा

परळी वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक ४ ते १० मार्च या कालावधीत ५१ व्या राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताहानिमित्त वेगवेगळ्या सुरक्षितता संबंधी जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले होते.

राष्ट्रीय सुरक्षितता दिवस व सप्ताहाची सुरुवात दिनांक ४ मार्च रोजी उपमुख्य अभियंता श्री. हिम्मतसिंग अवचार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यांनी उपस्थितांना औष्णिक विद्युत केंद्रात कामाच्या ठिकाणी वेगवेगळ्या सुरक्षितता नियमांचे पालन करण्यास सांगून सुरक्षितता संस्कृती अंगीकारण्यास सर्वांनी हातभार लावण्याचे आव्हान केले, तसेच वीज निर्मितीचे काम हे कुठल्याही अपघाताविना चालत रहावे, यासाठी मार्गदर्शन केले.

सुरक्षितता सप्ताहाची सांगता दिनांक १० मार्च रोजी झाली. यामध्ये संतोष चतुर्भुज व त्यांच्या चमूने "सेफ्टी की धडाकेबाज" हे पथनाट्य सादर केले व सुरक्षिततेचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. यानंतर संपूर्ण सप्ताहात भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांचा बक्षीस व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री. मोहनजी आव्हाड यांनी औष्णिक विद्युत केंद्रात वीजनिर्मिती करत असताना वेगवेगळ्या सुरक्षितता नियमांची पालन करून छोट्या शारीरिक इजांवर देखील मात करून अपघाताचे प्रमाण शून्य ठेवण्याचे आव्हान केले. सप्ताहातील विविध कार्यक्रमांसाठी विद्युत केंद्रातील विभाग प्रमुख, अभियंता, कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार, महिला इत्यादी उपस्थित राहून सुरक्षिततेचे नियम जाणून घेतले व त्याची अंमलबजावणी करण्याची शपथ घेतली. यासाठी उपमुख्य अभियंता श्री. श्याम राठोड, हिंमतसिंग अवचार, अधीक्षक अभियंता श्री. दिनकर इंगळे, श्री. होळंबे, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारे, वैद्यकीय अधीक्षक सौ. ज्योती रांदड, इ. उपस्थित होत्या. सुरक्षितता विभागाचे सुरक्षितता अधिकारी श्री. हरिभाऊ मैंदाड, युवराज शिंदे, सुधीरजी मुंडे, सीताराम वानोळे, देवकते, हरीभाऊ गीते यांनी सप्ताहातील सुरक्षिततेचे विविध कार्यक्रम आयोजित केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रात महिला कर्मचारी व वि.न. महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात दिनांक ७ मार्च २०२२ ते ९ मार्च २०२२ दरम्यान विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात महिलांचे क्रिकेट सामने, फनी गेम, अंताक्षरी स्पर्धा, पाककला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात डॉ. प्रिती कराळे यांचे "स्त्रीरोग विषयी मार्गदर्शन" महिलांकरिता आयोजित करण्यात आले होते. यामध्ये वसाहतीच्या महिला व कर्मचारी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दिनांक ८ मार्च २०२२ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन केल्यानंतर विविध महिला कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. दिनांक ९ मार्च २०२२ रोजी समारोप व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. जागतिक महिला दिनाचा संपूर्ण कार्यक्रमात महिला कर्मचारी व विद्युत नगर महिला मंडळ आयोजित कार्यक्रमात व स्पर्धेत हिरिरीने सहभाग घेऊन जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात पार पाडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे होते तर विशेष उपस्थिती म्हणून सौ. चंदा खटारे, सौ. विद्या गिरी, सौ. प्रिती पंधाडे व सौ. सपना पटीये लाभलेल्या होत्या. तसेच, या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्य अभियंता (प्रभारी) श्री. रवींद्र गिरी, तसेच अधीक्षक अभियंता श्री. धनंजय पंधाडे, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. राजेश गट्टूवार, सचिव कु. रोमाली शिराढोणकर तसेच महिला कर्मचारी सौ. सुनंदा बेहेरे, सौ. विजया उईके, कु. जयश्री उगळे, कु. योगिता वाघ, कु. सोनल उबाळे, कु. शीतल माळी, कु. शिल्पा तायडे, कु. विभुती सरोदे, कु. वैष्णवी कडू, सौ. प्रियंका द्रुकर, कु. भारती अंभोरे, कु. शारदा घोंगे, कु. स्वाती आंबेकर व श्रीमती आदिती धाराशिवकर इ. व विद्युत नगर महिला मंडळातून सौ. विजयालक्ष्मी दिवसे, सौ. ज्योती बर्वे, सौ. ज्योती खर्चे, सौ. लता पातोडे व सौ. पूजा जाधव इ. महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. प्रिती मानकर व आभार प्रदर्शन उप-कार्यकारी अभियंता कु. रोमाली शिराढोणकर यांनी केले.

श्रध्दांजली

## आपण यांना अंतरलो

१) **कै. रविकुमार घनश्याम प्रजापती**
कनिष्ठ अग्निशामक अधिकारी, चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र,
**मृत्यु दिनांक : ११/११/२०२१.**

२) **कै. पुंडलिक गोविंदा सोनुने**
तंत्रज्ञ-३, चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र,
**मृत्यु दिनांक : १०/०२/२०२२.**



## कोयना जल विद्युत केंद्रात शहीद दिन उत्साहात संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. २३ मार्च २०२२ रोजी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये शहीद दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे ह्यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी सहाय्यक अभियंत्या (एम.पी.डी) सौ. अंजली समुद्रे यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

सदर कार्यक्रमानिमित्त वरिष्ठ अभियंते, पुरुष/महिला अधिकारी-कर्मचारीवृंद उपस्थित होते.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात शहीद दिन उत्साहात संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्र येथील प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात दि. २३ मार्च २०२२ रोजी सकाळी शहीद दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. या प्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी, महिला अधिकारी-कर्मचारी व संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. महेंद्र शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. डी.जी. वंजारी यांनी मांडले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात संत गाडगेबाबा महाराज आणि संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी प्रशासकीय इमारत एच.ओ.डी. हॉल येथे संत गाडगेबाबा महाराज व संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे ह्यांनी संत गाडगेबाबा महाराज व संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांचे जीवनकार्याबद्दल उपस्थितांना माहिती विशद केली.

या प्रसंगी वरिष्ठ अभियंते, पुरुष/महिला अधिकारी-कर्मचारीवृंद अभिवादनासाठी उपस्थित होते. सदर अभिवादनपर कार्यक्रमादरम्यान कोरोना (कोव्हिड-१९) च्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय कार्यालयात छोटेखानी आणि सामाजिक अंतर पाळून घेण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन लघुलेखक श्री. अनिल कांबळे यांनी केले.

# अच्छे दिन

- डॉ. अतुल बनसोड
अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
कोराडी औ.वि. केंद्र (३×६६० मेगावॅट)




महाराष्ट्रात एस.टी. ने प्रवास न केलेला दुर्मिळच! पूर्वी लांब किंवा लहान प्रवास करीत एस.टी. शिवाय पर्याय नव्हता! खाजगी वाहनांचा एवढा सुळसुळाट नव्हता! प्रवास जरा कठीण होता पण आनंददायी होता! वेळेवर पोहोचणे वगैरे यावर विशेष भर नव्हता, पोहोचणे हाच एकमेव उद्देश होता!

मध्ये पारस पॉवर स्टेशनमध्ये काही कामाकरिता जाण्याचा योग आला, परतीचा प्रवास बसने करणार असे मनोमन ठरवले! मला बस प्रवास खुप आवडतो काय माहित पण एस.टी. आपली वाटते अन सुरक्षित पण! अकोला स्टँडवर आलो, नेहमीप्रमाणे बसची वाट पाहावी लागली, भाऊगर्दीत बसमध्ये चढलो, अजूनही एस.टी. ला प्रवासी मिळतात पाहून बरे वाटले.

गर्दीत एक गरीब वृध्द महिला प्रवासी कशीतरी आत चढली, बसायला जागा नव्हती तरी ती आपल्याच गाठोडयावर खाली बसली! मी बसायला जागा दिली तरी, "नाही, बापू तूच बस" म्हणून खालीच बसली! वाहकाने तिकिट देण्याचा कार्यक्रम सुरु केला, महिला वृध्द असूनही आधार कार्ड पाहुनच तिला सवलतीच्या दरात तिकिट दिले, मलाही तिकिट देऊन तो पुढे निघाला! एवढया गर्दीत प्रत्येकाला तिकिट देणे खरोखर अवघड! पुढे बस सुरु झाली, थांबे आले, काही उतरत गेले, काही चढत गेले! ती गरीब वृध्द स्त्री पुढे उतरली! मी वाहकाच्या सीटला समांतर असलेल्या सीटवर बसलो असल्यामुळे अधूनमधून त्याच्या लक्ष होते, तेव्हढ्यात दोन प्रवासी चढले, एक वाहकाजवळ बसला, दोघात काय बोलणे झाले ऐकू आले नाही पण देवाणघेवाण दिसली १०/२० रुपये देऊन ते तिकिट न घेताच विराजमान झाले! मी सहज त्यातला एका व्यक्तीला विचारले कुठे काम करता, तेव्हा तो राज्य सरकारचा कर्मचारी असल्याचे कळले, आणि आम्ही रोज अप-डाऊन करतो हे त्याने विशेष नमूद केले!

झालेला प्रकार माझ्याकरिता नवीन नव्हता. कुंपणच शेत खाते हे नक्की, पण आज मला ती गरीब वृध्द स्त्री आठवत होती. तिकिटाचे पूर्ण पैसे मोजून तिने खाली बसून प्रवास केला होता! कदाचित वाहकाने हा चिरीमिरीचा व्यवहार तिच्या बरोबर केला असता तर मला काही वाटले नसते थोडा दयाभाव तरी प्रतीत झाला असता! पण जे आर्थिक सबळ आहेत ते पूर्ण तिकिटाचे पैसे देऊ शकतात, त्यानांच विनातिकिट प्रवास करु द्यावा, हे दुदैव आहे। ती एक महिला अशिक्षित होती, गरीब होती, तिला दरडावून "बुढे, पूर्ण पैसे दे..." असे तुम्ही म्हणू शकता. अन् एका प्रतिष्ठित माणसाला विनातिकिट प्रवास करु देता. हा देश अधोगतीला नेणारी ही वृत्ती कधी संपणार, या देशात आम जनता इमानदार आहे म्हणूनच हा देश चालू आहे. शिकल्यासवरल्या लोकांपेक्षा अशिक्षितच बरे असे म्हणायची वेळ आली आहे. शिकून जर हेच करायचे तर त्या शिक्षणाला काय अर्थ, अन् नंतर पुन्हा शिरजोर होऊन सरकारला हा प्रतिप्रश्न विचारायचा "अच्छे दिन कब आयेंगे... ?"

******

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे सोमवार दिनांक ११ एप्रिल २०२२ रोजी सकाळी प्रशासकीय इमारत एच.ओ.डी. हॉल येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची १९५वी जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान त्यांचे जीवनकार्याबद्दल उपस्थितांना माहिती विशद करण्यात आली.

अभिवादनपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाकरिता उपमुख्य अभियंता (प्रशासन/संवसु) श्री. बाबासाहेब पाटील व श्री. शशांक चव्हाण तसेच अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते आणि अन्य अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारीवृंद अभिवादनासाठी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमादरम्यान कोरोना (कोव्हिड-१९) च्या पार्श्वभूमीवर अभिवादनपर कार्यक्रम प्रशासकीय कार्यालयात छोटेखानी, सामाजिक अंतर पाळून घेण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन टंकलेखक श्रीमती. शोभा दिलीप व्यास यांनी केले.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे शनिवार, दि. १९ फेब्रुवारी, २०१२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या कार्यक्रमात मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, उप मुख्य अभियंता - १ श्री. शरद भगत, उपमुख्य अभियंता - २ श्री अरुण पेटकर, उपमुख्य अभियंता (प्रशासन) श्री. जितेंद्र टेंभरे, विशेष कार्य अधिकारी (मा. ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य) श्री. यशवंत मोहिते, अधीक्षक अभियंते सर्वश्री. प्रविण रोकडे, श्री. विश्वास सोमकुवर, आणि अन्य पुरुष/महिला अधिकारी-कर्मचारी व कामगार या प्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) श्री. अमरजीत गोडबोले यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात यशवंतराव चव्हाण यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे शनिवार दिनांक १२ मार्च २०२२ रोजी सकाळी प्रशासकीय इमारत एच.ओ.डी. हॉल येथे यशवंतराव बळवंत चव्हाण यांची १०९ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान त्यांचे जीवन कार्याबद्दल उपस्थितांना माहिती विशद करण्यात आली.

अभिवादनपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे उपस्थित होते. तसेच अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष/महिला अधिकारी व कर्मचारीवृंद अभिवादनासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन टंकलेखक श्रीमती. शोभा दिलीप व्यास यांनी केले.

## कोयना जल विद्युत केंद्रात यशवंतराव चव्हाण यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. १२ मार्च २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस श्री. संजय जी. चोपडे, मुख्य अभियंता, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

या जयंती कार्यक्रमावेळी सहाय्यक अभियंता (आय.एस.ओ. विभाग) श्रीमती. माधुरी खाडीलकर यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, पुरुष/महिला अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे मंगळवार, दि. १५ फेब्रुवारी, २०१२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांचे शुभहस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

या कार्यक्रमास वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी, महिला अधिकारी-कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) श्री. अमरजीत गोडबोले यांनी केले.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे सोमवार, दि. २३ जानेवारी, २०२२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. नितीन सुर्यवंशी ह्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

या कार्यक्रमास औ.वि. केंद्रातील अभियंता, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) श्री. अमरजीत गोडबोले यांनी केले.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे सोमवार, दि. ३ जानेवारी २०२२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांचे शुभहस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

या कार्यक्रमास वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी, महिला अधिकारी-कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) श्री. अमरजीत गोडबोले यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात शहीद दिन संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे बुधवार दि. २३ मार्च २०२२ रोजी नाशिक औ वि.केंद्र, प्रशासकीय इमारत येथे "भगतसिंग, राजगुरू व सुखदेव" यांची शहीद दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा. श्री. एन. एम. शिंदे उपस्थित होते.

शहीद दिनाचे औचित्य साधून "भगतसिंग, राजगुरू व सुखदेव" यांच्या प्रतिमेस माल्य अर्पण करून अभिवादनपर कार्यक्रमात त्यांचे जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती विशद करण्यात आली.

या कार्यक्रमाकरिता उपमुख्य अभियंता (प्रशासन) श्री. शशांक चव्हाण तसेच अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते आणि अन्य अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारीवृंद अभिवादनासाठी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमादरम्यान कोरोना (कोव्हिड-१९) च्या पार्श्वभूमीवर अभिवादनपर कार्यक्रम प्रशासकीय कार्यालयात छोटेखानी, सामाजिक अंतर पाळून घेण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन टंकलेखक श्रीमती. शोभा दिलीप व्यास यांनी केले.

## तिलारीनगर ज.वि. केंद्र येथे महिला दिन संपन्न

दिनांक ८ मार्च २०२२ रोजी तिलारी विभागीय कार्यालयामार्फत, करमणुक केंद्र, तिलारी वसाहत, तिलारीनगर येथे सर्व महिला अभियंता / कर्मचारी व वसाहतीतील सर्व महिला व मुली याच्या उपस्थितीमध्ये जागतिक महिला दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. राजमाता माँ जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून फोटो पूजन करण्यात आले. सर्व महिला अभियंता / कर्मचारी आणि वसाहतीतील सर्व महिला यांची, सौ. माधुरी सावंत, प्राथमिक आरोग्य केंद्र, हेरे यांचेमार्फत मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच 'महिलांचे आरोग्य सुदृढ व निरोगी कसे राखावे', याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

त्यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा यांनी सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या व जागतिक महिला दिनाची या वर्षीची जागतिक स्तरावरील ऊपस येणाऱ्या उज्ज्वल भविष्यासाठी 'स्त्री - पुरूष समानता' यावर त्यांचे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर काही महिला कर्मचारी तसेच वसाहतीत राहणाऱ्या काही महिलांनी व मुलींनी उस्फुर्तपणे आपले विचार व्यक्त केले आणि त्यांना बोलण्याची संधी दिल्याबद्दल महानिर्मिती कंपनीचे व तिलारी विभागीय कार्यालयाचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमावेळी सर्व महिला प्रोत्साहित होतील असा संदेश असलेले स्मृतीचिन्ह व गुलाबपुष्प देऊन, सर्व महिलांना सन्मानित करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी श्री. व्ही.एस. गणाचारी, कार्यकारी अभियंता यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सौ. प्रियांका पाटील, सहा. अभियंता, तिलारी विभागीय कार्यालय, तिलारीनगर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पाडण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. दिपाली कांबळे तंत्रज्ञ- ३ यांनी केले. सौ. दिपाली पाटील, तंत्रज्ञ-३ यांनी आभार प्रदर्शन केले व सर्वात शेवटी अल्पोपहाराचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची उत्साहात सांगता झाली.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात महिला दिन उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात दि. ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. खापरखेडा औ.वि. केंद्रातील मनोरंजनगृह क्र. १ येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या शुभहस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सन २०२२ मध्ये निवृत्त होणाऱ्या महिला अधिकारी/ कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच ज्या महिला अधिकारी कर्मचारी यांनी कर्तव्यावर कार्यरत असताना उल्लेखनीय कामगिरी केली त्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

जागतिक महिला दिनानिमित्त सौ. माया ब्राह्मणे, प्रसुतीरोग तज्ञ, नागपूर याचे "स्त्रियांचे आरोग्य व समस्यांचे निराकरण" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या दरम्यान सौ. माया ब्राह्मणे यांनी स्त्रियांमध्ये होणाऱ्या वेगवेगळ्या समस्या व त्यांचे निराकरण करण्यासाठी कशाप्रकारे काळजी घेऊन कोणकोणती चाचणी करायला पाहिजे जसे, वयाच्या ४५ वयोगटानंतर CBC, Sugar, Thyroid Test, D3 B12, BMB-DEX Scan, USG, Blood Pressure, Dental, Eye Checkup, Breast Cancer, Cervical Cancer, Uterus Endometriosis, Investigations according to age and Disease इत्यादीचे आपल्या जीवनात महत्त्व सांगून त्याबाबत कोणकोणत्या चाचण्या कराव्यात याबद्दल त्यांनी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

त्यानंतर उपस्थित अधिकारी/अभियता व महिला कर्मचारी यांनी जागतिक महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर संगीत, ॲक्टीविटी गेम, नृत्य, गायन असे विविध सांस्कृतिक उपक्रम घेऊन बक्षिस वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

सदर कार्यक्रमासाठी मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे, उप मुख्य अभियंता (२) श्री. अरूण पेटकर, उप मुख्य अभियंता (१) श्री. शरद भगत, उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. जितेंद्र टेंभरे, अधीक्षक अभियंता सर्वश्री. अनिल काठोये, संदीप देवगडे, श्री विश्वास सोमकुवर, कल्याण अधिकारी (प्रभारी) श्री. अमरजीत गोडबोले, कार्यकारी अभियंत्या सौ. संस्कृती रहाटे, सौ. भारती सोळंके, व्यवस्थापक सौ. लतिका मेश्राम तसेच खापरखेडा, औ.वि. केंद्र कार्यालयात कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी तसेच कंत्राटी कामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सहाय्यक अभियंता पूजा चव्हाण, कनिष्ठ अभियंत्या शिल्पा पाटील व स्नेहा अवझे तसेच आभार प्रदर्शन कनिष्ठ अभियंता निशा खेडीकर यांनी मांडले.

## कोयना जल विद्युत केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथे दि १४ एप्रिल २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

सदर अभिवादनपर कार्यक्रमास अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, अधीक्षक अभियंते सर्वश्री ए.डी. शिंदे, श्री. ब्रम्हानंद कोष्टी, श्री. एम.एन. फडतरे, तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी, अभियंते, आणि कार्यालयातील पुरुष व महिला अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तांत्रिक विभाग) सौ. स्नेहल नकाते यांनी सदर अभिवादनपर कार्यक्रमावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे सोमवार, दि. ११ एप्रिल २०२२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे, यांच्या शुभहस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. याप्रसंगी उप मुख्य अभियंता-२ श्री. अरूण पेटकर, उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. जितेंद टेंभरे आणि अन्य वरिष्ठ अधिकारी, अभियंते, कर्मचारी, महिला कर्मचारी व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

सदर अभिवादनपर कार्यक्रम कोरोना (कोव्हिड-१९) च्या पार्श्वभूमीवर छोटेखानी आणि सामाजिक अंतर पाळून घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार श्री. अमरजीत गोडबोले, प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) यांनी केले.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे गुरुवार, दि. १४ एप्रिल २०१२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांचे शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या प्रसंगी उप मुख्य अभियंता-१ श्री. शरद भगत, उप मुख्य अभियंता-२ श्री. अरुण पेटकर आणि वरिष्ठ अधिकारी, अभियंते, कर्मचारी, महिला कर्मचारी व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार श्री. अमरजीत गोडबोले, प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) यांनी केले.

## कोयना जल विद्युत केंद्रात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथे दि. ११ एप्रिल २०२२ रोजी सकाळी प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले याच्या प्रतिमेस मुख्य अभियता श्री. संजय चोपडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

सदर अभिवादनपर कार्यक्रमास अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी, अभियंते आणि कार्यालयातील पुरुष व महिला अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तांत्रिक विभाग) सौ. स्नेहल नकाते यांनी सदर अभिवादनपर कार्यक्रमावेळी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक १ मे २०२२ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे, तर प्रमुख उपस्थिती म्हणून उप मुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंता श्री. धनजय पंधाडे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार लाभले होते. तसेच अन्य अधिकारी-कर्मचारी, अभियंते-तंत्रज्ञ यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

त्यानंतर कामगार कल्याण मंडळाद्वारे, गट कार्यालय, पारस येथे जागतिक कामगार दिनानिमित्त कामगारविषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांनी भूषविले. व्याख्याते श्री. आमटे व श्री. अंभोरे यांनी कामगारांच्या समस्येविषयी माहिती दिली. श्री. विठ्ठल खटारे मुख्य अभियंता यांनी औद्योगिकीकरणामध्ये कामगाराची भूमिका महत्वाची असून कामगार हा मुख्य घटक असल्याचे प्रतिपादित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कामगार कल्याण मंडळाची सहाय्यिका श्रीमती. खराटे यांनी केले.

# नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

नाशिक औ. वि. केंद्र एकलहरे वसाहत येथे सालाबादप्रमाणे सार्वजनिक शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरी करण्याचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी अंतर्गत व आजादी का अमृत महोत्सव यांचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समितीद्वारे बुधवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी, सहयाद्री स्पेशालिस्ट हॉस्पिटल, नाशिक यांच्याद्वारे विनामूल्य हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता मा.श्री. एन. एम. शिंदे, उप मुख्य अभियंता (संचलन व सुव्यवस्था / प्रशासन) श्री. बाबासाहेब पाटील, श्री. शशांक चव्हाण, अधीक्षक अभियंता श्री. प्रविण गोसावी, श्री. अभिजीत आहेर, कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती कोंडावले, सहा महाव्यवस्थापक (मास) श्री. समिर देऊळकर, वरिष्ठ व्यवस्थापक श्री संदिप कापसे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. गुलाब कदम तसेच अधिकारीवर्ग अभियंते व कर्मचारी व कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष/सचिव श्री. वसंत राजोळे, श्री सचिन बोराडे तसेच जयंती उत्सव समिती पदधिकारी यांची उपस्थिती होती.

सदर सह्याद्री स्पेशालिस्ट हॉस्पिटल नाशिक यांच्याद्वारे विनामूल्य हृदय तपासणी शिबीराच्या आयोजनावेळी सह्याद्री स्पेशालिस्ट हॉस्पिटलचे प्रसिद्ध डॉ. अभिषेक पिपराळेकर, आणि त्यांची एकूण सात टिम सदस्य या शिबीरास उपस्थित होते. या शिबीराचा लाभ नाशिक औ.वि. केंद्रातील सर्व अधिकारी अभियंता कर्मचारीवृंद आणि त्यांचे कुटुंबातील सदस्य तसेच कंत्राटदार व कामगार यांनी सुध्दा लाभ घेतला. या शिबीरास सुमारे २०० २५० पुरुष / महिला उपस्थित होते. सदर प्रसंगी कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता मास्क वाटप सॅनिटायझर इ. चा उपयोग करण्यात आला.

**१. विनामुल्य हृदय, तपासणी :-** नाशिक औ. वि. केंद्र, एकलहरे वसाहत येथे सालाबादाप्रमाणे सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरी करण्याच्या औचित्य साधून सामाजिक बांधिलकी अंतर्गत व **आजादी का अमृत महोत्सव** चे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समितीद्वारे बुधवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी, सह्याद्री स्पेशालिस्ट हॉस्पिटल, नाशिक यांच्याद्वारे विनामुल्य हृदय, तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री. एन.एम. शिंदे, उप मुख्य अभियंता (संवसू/प्रशासन) श्री. बाबासाहेब पाटील, श्री. शशांक चव्हाण, अधीक्षक अभियंता, श्री. प्रविण गोसावी, श्री. अभिजीत आहेर, कल्याण अधिकारी, श्री. निवृत्ती कोंडावले सहा महाव्यवस्थापक (मास) श्री. समिर देऊळकर वरिष्ठ व्यवस्थापक श्री. संदिप कापसे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. गुलाब कदम तसेच अधिकारीवर्ग, अभियंते व कर्मचारी व कार्यक्रमाचे कार्यध्यक्ष/सचिव श्री. वसंत राजोळे, श्री. सचिन बोराडे तसेच जयंती उत्सव समिती पदाधिकारी हे उपस्थित होते.

सदर सह्याद्री स्पेशालिस्ट हॉस्पिटल, नाशिक यांच्याद्वारे विनामुल्य हृदय, तपासणी शिबीराचे आयोजनावेळी प्रसिध्द डॉ. अभिषेक पिपंराळेकर, आणि त्यांची एकुण सात टिम सदस्य या शिबीरास उपस्थित होते. या शिबीराचा लाभ नाशिक औ.वि. केंद्रातील सर्व अधिकारी/अभियंता/ कर्मचारीवृंद आणि त्यांचे कुटुंबातील सदस्य तसेच कंत्राटदार व कंत्राटी कामगार यांनी सुध्दा लाभ घेतला. या शिबीरास सुमारे २०० ते २५० पुरूष / महिला उपस्थित होते. सदर शिबीराबाबत कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता मास्क वाटप, सॅनिटायझर यांचा उपयोग करून शिबीर यशस्वी पार पाडले.

**२ विनामुल्य यकृत (लिव्हर) तपासणी शिबीर :-** तसेच गुरूवार दि. १७/०२/२०२२ रोजी अशोका मेडिकेअर नाशिक यांच्या विद्यमाने नाशिक औ. वि. केंद्रातील अधिकारी कर्मचारी कंत्राटदार व कंत्राटी कामगार व वसाहतवासी यांचेसाठी विनामुल्य यकृत (लिव्हर) तपासणी शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. याकरिता अशोका मेडिकेअर नाशिकचे नामांकित डॉ. तुषार संकलेचा यांच्या विद्यमाने आणि त्यांचे टिमद्वारे विनामुल्य यकृत म्हणजेच लिव्हर तपासणी करण्यात आली. याकरिता कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री. एन. एम शिंदे, उप मुख्य अभियंता (संवसू / प्रशासन) श्री. बाबासाहेब पाटील, श्री. शशांक चव्हाण, अधीक्षक अभियंता श्री. प्रविण गोसावी, श्री. अभिजीत आहेर, कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती कोंडावले, सहा महाव्यवस्थापक (मास) श्री. समिर देऊळकर, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. संदिप कापसे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. गुलाब कदम तसेच अधिकारीवर्ग, अभियंते व कर्मचारी व कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष/सचिव श्री. वसंत राजोळे, श्री. सचिन बोराडे तसेच जयंती उत्सव समिती पदधिकारी यांच्या उपस्थितीत होते. या शिबीराचा लाभ नाशिक औ.वि. केंद्रातील सर्व अधिकारी/अभियंता/ कर्मचारीवृंद आणि त्यांचे कुटुंबातील सदस्य तसेच कंत्राटदार व कंत्राटी कामगार यांनी सुध्दा लाभ घेतला. या शिबीरास सुमारे २०० ते १२५ पुरूष / महिला उपस्थित होते.

**३. रस्सी खेच स्पर्धा :-** गुरूवार दिनांक १७/०२/२०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्रातील सर्व विभागातील अधिकारी/ अभियंता कर्मचारीवृंद यांच्याकरिता रस्सीखेच हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेण्यात आला, जयंती उत्सव समितीद्वारे विजेत्यांना बक्षीस व शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला.

**४. भव्य रक्तदान शिबीर :-** शुक्रवार दिनांक १८/०२/२०२२ रोजी जिल्हा रूग्णालय नाशिक यांच्या विद्यमाने भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते. या भव्य रक्तदान शिबीरामध्ये नाशिक औ. वि. केंद्रातील अधिकारी/अभियंते / कर्मचारी व कंत्राटदार व कंत्राटी कामगार व वसाहतीतील कुटुंबातील सदस्य यांनी सुध्दा सहभाग नोंदवला. या शिबीरास सुमारे ६५ बॅग संकलित करण्यात आल्या. रक्तदान शिबीरादरम्यान मदतीचा हात मिळाल्याने जिल्हा रूग्णालय नाशिक यांच्यावतीने सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे कार्याध्यक्ष श्री. वसंत राजोळे आणि जयंती उत्सव समिती सदस्यांचा शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला. याबाबत मुख्य अभियंता व विद्युत केंद्रातील अधिकारी/ अभियंते व कर्मचारी यांनी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे सर्वत्र अभिनंदन केले.

**५. पोवाडे व लोकगीतांचा बहादार सांस्कृतिक कार्यक्रम :-** शुक्रवार दिनांक १८/०२/२०२२ रोजी सायंकाळी ७:०० वाजता महाराष्ट्राची लोकपरंपरा जपणारा लोकप्रिय भक्तीगीत, पोवाडे व लोकगीतांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राष्ट्रभुषण शाहीर श्री. रूपचंद चव्हाण आणि त्यांची टिम गायक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य पोवाडे गायन करुन सदर रंगमंच भारावून टाकला होता, या कार्यक्रमास सर्वत्रित जनसमुदाय उपस्थित होता.

**६. रात्री १२:०० वाजता महापूजन :-** शुक्रवार दिनांक १८/०२/२०२२ रोजी रात्री १२:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री. एन. एम शिंदे यांच्या हस्ते माल्यार्पण करून छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करण्यात आली. या भव्य अशा कार्यक्रमास उप मुख्य अभियंता (संवसू / प्रशासन) श्री. बाबासाहेब पाटील, श्री. शशांक चव्हाण, अधीक्षक अभियंता श्री. प्रविण गोसावी, श्री. अभिजीत आहेर, कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती कोंडावले, सहा महाव्यवस्थापक (मास) श्री. समिर देऊळकर, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. संदिप कापसे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. गुलाब कदम तसेच अधिकारीवर्ग, अभियंते व कर्मचारी व कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष/सचिव श्री. वसंत राजोळे, श्री. सचिन बोराडे तसेच जयंती उत्सव समिती पदाधिकारी नाशिक औ.वि.

केंद्रातील सर्व संघटना प्रतिनिधी व जनसमुदाय उपस्थित होते.

**७. शिवव्याख्याते यांचे व्याख्यान :-** शनिवार दिनांक १९/०२/२०२२ रोजी सकाळी छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त शिवव्याख्याते सौ. सुनंदाताई भोस, जिल्हा अध्यक्ष, संत नामदेव तुकाराम वारकरी परिषद, अहमदनगर आणि त्यांची टिम यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची ख्याती आणि त्यांचा बाणा हा कसा होता याबाबत सविस्तर माहिती सर्व उपस्थितांना सांगण्यात आली.

**८. माजी सैनिक यांचा सत्कार :-** शनिवार, दिनांक १९/०२/२०२२ रोजी छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त भारताकरिता रक्षणकर्ते माजी सैनिक, त्यांचा अनुभव आणि त्यांनी देशाकरिता केलेल्या योगदानाची माहिती, त्यांनी भाषणात सविस्तर कार्यक्रमादरम्यान सांगण्यात आली. याबाबत मुख्य अभियंता श्री. एन.एम. शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

**९. महिला वर्ग यांना लकी ड्रॉ कार्यक्रम :-** शनिवार दिनांक १९/०२/२०२२ रोजी शिवव्याख्याते व मुख्य अभियंता तसेच महिला वर्ग यांच्या हस्ते कार्यक्रमास उपस्थित असलेल्या महिलावर्ग यांना कार्यक्रमादरम्यान लकी ड्रॉ प्रमाणे ५ पैठणी आणि सत्कार करण्यात आला.

**१०. छत्रपती शिवाजीमहाराज यांची भव्य मिरवणूक :-** शनिवार दिनांक १९/०२/२०२२ रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजीमहाराज यांची सार्वजनिक जयंतीनिमित्त नाशिक औ. वि. केंद्रातील परिसरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमास कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री. एन.एम. शिदे यांच्या उपस्थितीत उप मुख्य अभियंता (संवसू/प्रशासन) श्री. बाबासाहेब पाटील, श्री. शशांक चव्हाण, अधीक्षक अभियंता श्री. प्रविण गोसावी, श्री. अभिजीत आहेर, कल्याण अधिकारी, श्री. निवृत्ती कोंडावले सहा महाव्यवस्थापक (मासं) श्री. समिर देऊळकर, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. संदिप कापसे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री गुलाब कदम तसेच अधिकारीवर्ग, अभियंते व कर्मचारी व कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष / सचिव श्री. वसंत राजोळे. श्री. सचिन बोराडे तसेच जयंती उत्सव समिती पदाधिकारी, नाशिक औ.वि. केंद्रातील सर्व संघटना प्रतिनिधी व जनसमुदाय या कार्यक्रमास उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडल्याबाबत सार्वजनिक छत्रपती शिवाजीमहाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सन २०२२ यांच्या वतीने व नाशिक औ. वि. केंद्र, एकलहरे येथील अधिकारी / अभियंते / कर्मचारीवृंद तसेच सर्व विभागप्रमुख यांचे सहकार्याबद्दल आभार मानले.

## कोयना जल विद्युत केंद्र संकुलात महिला दिन उत्साहात संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे दि. ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिन यशस्वीरित्या साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कोयना जल विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे व अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री राजेश कुंभार, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. १ व २) श्री राजीव रेड्डी, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. ४) श्री. अजय शिंदे व अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. ३) श्री. ब्रम्हानंद कोष्टी याची विशेष उपस्थिती लाभली.

जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी वालावलकर हॉस्पिटल, डेरवण येथील डॉ. रूपाली चव्हाण यांनी उपस्थित महिलांना "ताण व्यवस्थापन" या विषयावर उत्तम मार्गदर्शन केले. ताणासारखा किचकट विषय अत्यंत मनोरंजक पध्दतीने मांडून छोट्या उदाहरणामधून सकारात्मकता कशी वाढवावी, याबद्दल महिलांच्या जाणिवा जागृत केल्या आहारविहार, निद्रा याचा समतोल मानसिक स्वास्थ्याशी कसा निगडीत आहे हे वाढते प्रमाण लक्षणे, निदान व त्यावरील उपचाराबाबत महिलामध्ये जागरूकता निर्माण केली.

दिनांक ८ मार्च २०२२ रोजी वसाहतीमधील नवीन मनोरंजनगृह येथे डॉ. वालावलकर हॉस्पिटल, डेरवण यांचे मार्फत "वुमन्स वेल बिईंग" कोयना शिबिरातर्गत कोयना संकुलातली महिला अधिकारी, कर्मचारी व बाहयस्त्रोत महिला वर्गाची माफक दरात पूर्ण शारिरीक तपासणी करण्यात आली.

तसेच दिनांक १० मार्च २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथील प्रशासनाच्या पुढाकाराने अपरांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, चिपळूण यांचेकडून केंद्रातील व वसाहतीमधील महिलाची आरोग्य तपासणी व तज्ञाचे मार्गदर्शन डॉ. भक्ती पालांडे याचेमार्फत करण्यात आली. महिलांच्या अनेक वैयक्तिक आरोग्य समस्येवर तज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रशासनाने कोयना जल विदयुत केंद्र पोफळी या आस्थापनेवरील कार्यरत महिला अधिकारी / कर्मचारी यांनी केलेल्या उल्लेखनीय गौरव म्हणून संकुलातील कार्यरत महिला अधिकारी डॉ.सौ. मृदुला पवार, सौ. स्नेहल नकाते कोरे, कु. पूजा गवळी व श्रीमती. सुनिता परमणे याचा मुख्य अभियंता श्री. चोपडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक आणि पुस्तिका देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगतामध्ये मुख्य अभियंता श्री. चोपडे यानी महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाबददल महिलामधील आयोजन कौशल्य चिकाटी प्रोत्साहन, पाठिंबा, आणि विश्वास याबद्दल त्याच्या भाषणामध्ये केलेले कौतुक महिला वर्गासाठी खुप प्रेरणादायी ठरले आणि उपस्थित सर्व महिला अधिकारी-कर्मचारी यांना जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. जागतिक महिला दिनानिमित्त कोयना जल विद्युत केंद्र सकुलातील महिलांसाठी प्रश्नमंजुषा व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते व मोठ्या संख्येने यामध्ये महिलांचा सहभाग होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. स्नेहल नकाते कोरे व श्रीमती. माधुरी खाडीलकर यांनी केले तसेच प्रमुख अतिथींचा परिचय व आभार प्रदर्शन सौ. मलिका मुजावर यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम यांनी विशेष परिश्रम घेतले आणि व्यवस्थापन आणि प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम व्यवस्थितरित्या संपन्न झाला व कोयना संकुलातील महिलाबरोबरच वसाहतीमधील महिलांच्या सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

# फक्त एक पृथ्वी... काळजी आणि संवर्धन

– राजेश अंबादास पवार,
उप व्यवस्थापक (वित्त व लेखा),
भुसावळ औ.वि. केंद्र.



सकाळी सकाळी मी फिरायला नेहमीसारखा उठतो खरा, पण रात्रभराच्या गर्मीने उशिरा झोपून सकाळच्या थंड गारव्याच्या हव्यासाने पुन्हा पांघरुण ओढून मस्त पडून राहिलो. झोप लागत नव्हती पण विचार मात्र सुरु होते. विचारचक्र असे फिरत होते जसे घड्याळाच्या काट्यांना संगीत द्यायला सांगून विचारांनी माझ्या मनात गोंधळ घालायचे ठरविले होते. असो, विचारांना कोण थांबवणार म्हणा...? साधा विचार थांबवायचा विचार सुध्दा आपण करु शकत नाही. असो, पण विचार काय सुरु होते ते आधी सांगतो.

लहानपणी पहिली इयत्तेपासून सातवीपर्यंत शाळा सकाळचीच असायची. काही असो, थंडी असो वा पाऊस, रोज आंघोळ करायची मोठी हौस. नाही कसे म्हणणार, आंघोळ कशीही करा पण शाळेत जा. तेव्हाची थंडी आणि आत्ताची थंडी, तेव्हाचा पाऊस आणि आत्ताचा पाऊस, तेव्हाचा उन्हाळा आणि आत्ताचा उन्हाळा फरक का आहे. तेव्हाची पृथ्वी आणि पृथ्वी जशीच्या तशी आकाराने असेल पण त्यावरील मानवीय आकाराने ग्रासलेली असेल. आणि पृथ्वीवर मानवाचा हक्क आहे, असे जरी मानवाला वाटत असेल पण त्या पृथ्वीची काळजी घेणे हे सुध्दा आपले कर्तव्य आहे हे तो का विसरतो? काय सांगू तुम्हांला प्रत्येक देशाची आणि प्रत्येक मानवाची जशी शर्यतच लागलेली आहे, पृथ्वीला कसे नष्ट करायचे ते. पृथ्वीवरील सोने असो वा कोळसा, दगड असो वा माती, कशी संपवू आणि कशी नष्ट करु पृथ्वी आणि सूर्याच्या निसर्गाची नाती... सोन्याचा संबंध कोळशाशी आहे, तसा दगडाचा संबंध मातीशी आहे. पृथ्वीला निसर्ग सौंदर्य दिले ते पाणी, वृक्ष, डोंगर, नदी, समुद्र, गौण खनिजे आणि छोट्या छोट्या ग्रहांनी जे पृथ्वीच्या आजुबाजूला असतात परिक्रमा करतात आणि अवकाशात एकमेकांच्या गुरुत्वाकर्षण शक्तीने एकमेकांना बांधून ठेवतात. ग्रहांचा परिणाम पृथ्वीवर, समुद्रावर आणि पृथ्वीचा आपल्या सृष्टीवर सातत्याने होत असतो व मानव ग्रहांवर नातं आहे, मानवाने त्यांना सुध्दा सोडले नाही. तेथेही हक्क दाखवित अतिक्रमण करणे सुरु केले आहे. समजा, मग सर्व ग्रहांनी व पृथ्वीने आपले नियम बदलविणे सुरु केल्यावर फरक पडणारच आहे आणि आज तो फरक आपल्याला दिसत आहे. आपल्या उन्हाळ्यात, थंडी, वाऱ्यावर, वादळावर आणि खास पावसावर खुप मोठ्या प्रमाणात फरक पडत आहे, कारण आपण आजचा विचार करत आहोत, उद्याचा नाही...

मला एक माझा मित्र भेटला होता... काल .. ..

मित्र – नमस्कार! अरे मित्रा, मी घर बांधत आहे, काही आईडिया असतील तर सुचवशील.

मी – (मला आनंद झाला) छान / अरे व्वा / प्लॉट किती आहे.

मित्र – काही जास्त नाही १२०० आहे आणि बांधकाम सुध्दा तेवढेच आहे पार्किंगसह.

मी – का ? म्हणजे गार्डन, झाडे या साठी जागा नाही सोडली.

मित्र – अरे / आपल्यालाच जागा कमी पडते... (मी शांत .... राहिलो काय बोलणार)

आपल्याला आनंदच आहे.... मोठ मोठे रस्ते होत आहेत, इमारती बांधत आहेत पण प्रगती सोबत झाडेच्या झाडे पडत आहेत, पशु–पक्षी बेघर होत आहेत, शेतच्या शेत खंडहर जमीन होत आहेत ही अधोगती नाही लक्षात येत.

काय उन्हाळा आहे, पारा दरवर्षी वाढतच आहे. अरे, बाबा रस्ते काँक्रीटचे तर तापमान वाढणारच ना...

"कुछ मिला है आपको तो हमे क्या गम है,
ऐ मेरे प्यारे इन्सान"
"बस चर्चा नही होती, हमारी कुर्बानी की,
कहते है परिंदे बेजुबान"

सकाळी उठल्यावर सुर्य, रोजच्यासारखा तापतो,
पृथ्वी असो वा इतर ग्रह, सर्वांसाठी तो राबतो.
कोवळया कोवळया किरणांनी, पशु–पक्ष्यांना जागवतो,
अंधाराला दूर सारुनी सृष्टी सौंदर्य तो दाखवतो.

लहान असोत मोठे, सर्वांना समान तो वागवतो,
जलचक्रावर हात फिरवुनी, तहान तोच भागवतो.
बाप म्हणू त्याला की साऱ्या सृष्टीचे निर्माते,
अपेक्षा न ज्याला, ते साऱ्या जिवांचे विधाते.
पृथ्वी सुध्दा आपल्या लेकरासाठी, राब-राब राबते.
उपाशी तापाशी जीवांसाठी, ती दिवस रात्र जागते.
आई तर आहे ती सर्वांची, तिलाच सर्वांची माया.
सर्व मिळुन लावू, जगवू चार झाडे, मिळेल थंड छाया .
होईल संवर्धन वसुंधरेचे, दुरुस्त होईल चुकी,
थांबवू ऱ्हास या सृष्टीचा, होईल निसर्ग सुखी.

माझे कवितेचा आवाज वाढतच ... असतांना, एक आवाज अचानक आला, "काहो काय बडबडताय झोपेत ? उठा, आज जागतिक पर्यावरण दिन आहे. ५ जून... उठा, कार्यक्रमाला जायचे आहे ना... उठा तर..."
मग ठरविले आपण नुसते कार्यक्रम घेऊन चालणार नाही. तर प्रत्यक्षात कृती करायलाच पाहिजे. या पावसाळ्यात चार झाडे नक्की लावायची असे ठरविले आणि तयारीला लागलो.

नक्की म्हणजे नक्की खोटे वाटत असेल तर बघायला याल...

******

प्रशासकीय वृत्त

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मेडिक्लेम पॉलिसीसंबंधित समस्या निवारण सत्राचे आयोजन

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली M/s Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. चे व्यवस्थापक श्री. अमित गायकवाड यांच्यासोबत सौदामिनी प्रशासकीय इमारत सभागृह येथे नुकतीच बैठक घेण्यात आली, सदर बैठकीत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

सदर बैठकीस श्री. अमरजीत गोडबोले (कल्याण अधिकारी प्रभारी) समवेत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, सबॉर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशन, विदर्भ राष्ट्रीय इलेक्ट्रिसिटी वर्कर्स युनियन (इंटक), ग्रॅज्युएट इंजिनिअरींग असोसिएशन, बहुजन विद्युत अभियंता, अधिकारी व कर्मचारी फोरम, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कामगार संघटना, पॉवर फ्रन्ट, महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी अधिकारी अभियंता सेना, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन, कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी संघटना व राष्ट्रीय वीज ड्रायव्हर्स ॲण्ड क्लिनर असोसिएशन या संघटनेचे प्रत्येकी दोन-दोन प्रतिनिधी उपस्थित होते.

सदर बैठकीत M/s. Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. चे व्यवस्थापक श्री. अमित गायकवाड यानी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy या बद्दल कर्मचाऱ्यांचे समस्याचे निराकरण करण्यासबंधी सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

१) कर्मचारी यांना ॲलेक्सिस हॉस्पिटलमध्ये दाखल करतेवेळी होणाऱ्या समस्या जसे ॲलेक्सिस हॉस्पिटल कॅशलेस असताना सुद्धा हॉस्पिटलद्वारे Security Deposit म्हणून ॲडव्हान्स कर्मचाऱ्यांकडून मागण्यात येतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. त्याकरिता संघटनेचे कर्मचारी यांच्याव्दारे पत्रव्यवहार करून M/s Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. चे व्यवस्थापक यांच्याकडून ॲलेक्सिस हॉस्पिटलला कळविण्यात येईल.

२) MD India o Paramount TPA यांच्याद्वारे क्लेम फॉर्मची हार्ड कॉपी कर्मचाऱ्यांना देण्यात येत होती त्याचप्रमाणे M/s Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. याच्याद्वारे कलम फॉर्मची हार्ड कॉपी कर्मचाऱ्याना देण्यात यावी तसेच क्लेम फॉर्म हा सुटसुटीत असायला पाहिजे.

३) M/s Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. चे मुख्य कार्यालय, पुणे येथे असल्यामुळे कर्मचारी व व्यवस्थापन यांचा प्रत्यक्षात संपर्क होत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना जाच सहन करावा लागत असतो, त्यामुळे M/s Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. ची एक शाखा नागपूर मध्ये असणे गरजेचे आहे.

४) महानिर्मिती कंपनीतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या त्यांच्या कुटुंबातील सदस्याकरिता दिलेल्या सवलतीमध्ये महिला कर्मचारी यानी आई-वडील किंवा सासु-सासरे याची नावे नोंदणी करण्याची मुभा आहे. तसेच पुरुष कर्मचारी यांना सुद्धा ही अशी मुभा देण्यात यावी.

५) महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या जुळ्या मुलांसाठी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy मध्ये वेगळी व्यवस्था करण्यात यावी, जेणेकरून जुळ्या मुलामुलींच्या केसमध्ये कर्मचाऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही.

६) त्याचप्रमाणे New Born Baby, Newly Married, Newly Joining Employee, Claim Settlement, Non Payable Charges, Cashless Services, Medi Assist च्या पॅनलवर असलेले हॉस्पिटल याबाबत M/s Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. चे व्यवस्थापक श्री. अमित गायकवाड व संघटनेचे पदाधिकारी यांच्या सोबत विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

# स्माईल प्लीज !!

– नितीन जोगळेकर,
अतिरिक्त कार्यकारी अभियंता (कार्ये),
सांघिक कार्यालय, मुंबई.



संध्याकाळची वेळ, त्या हॉलमध्ये छान गाण्यांचा कार्यक्रम सुरू होता. सुरेल आवाजात, लय आणि तालात सादर होत असलेल्या एकाहून एक मस्त मधुर गीतांनी वातावरण सुरेल आणि श्रोते तल्लीन झाले होते. हळूहळू कार्यक्रम संपत आला आणि लोक घरी परतू लागले होते. मीही त्याच गडबडीत असताना तो पटकन पुढे आला आणि पायाला लवून नमस्कार केला. माझे खरंतर लक्षच नव्हते.

"मॅडम, नमस्कार! ओळखले का मला?"

माझी प्रश्नार्थक मुद्रा पाहून तोच हसून बोलला.

"अहो, मी प्रवीण, १९९५ ची १० वी ची बॅच. तुम्ही आम्हाला मॅथ्सला होता."

मी म्हणाले, "असेल बाबा, आता दरवर्षी एवढे विद्यार्थी असतात, नाही लक्षात राहत माझ्या. पण तु मात्र ओळख दिलीस, खरंच खूप बरं वाटलं."

"मॅडम, तुम्ही ओळखीच्यांना भेटून घ्या. मी आहे इथेच जवळपास. त्यावेळी आपण शांतपणे बोलूयात, पण तुम्हाला वेळ असेल तर."

मला घरी जायचं होते, पण त्याचे मन मोडवेना. एवढ्या वर्षांनी भेटतोय तर... "ठीक आहे, तु म्हणतो तर... तसं करू... थांबते थोडा वेळ."

काही वेळातच आम्ही तिथल्या छोट्याशा बागेत एका बेंचवर बसलो आणि बोलणे पुढे सुरु झाले.

"अरे प्रवीण, सध्या काय सुरु आहे मग, नोकरी की काही धंदा वगैरे..." मी सुरुवात केली.

"मॅडम, खूप काही घडलं आयुष्यात, ते सगळे सांगायचंय. म्हणून तर म्हटलं बसा. तुम्हाला तर सगळ्या टीचर लोकांना माहितीच आहे की, मी काही फार हुशार नव्हतो, जेमतेम मार्क मिळवून पुढे एकेक इयत्ता लाईनमध्ये सरकत राहिलो. १०वी नंतर काय करायचं काहीच ठरल नव्हतं आणि सांगणार तरी कोण म्हणा, आमच्या घरात, नात्यात कोणीच फार शिकलं नाही. मग असंच १२वी कॉमर्स केलं आणि शिक्षण थांबवलं. एका मॅडमनी २ वर्षे बस पासचे पैसे भरले, बाकी टीचर्स, वर्गातले मित्र यांनी काही मदत केली म्हणून जमलं तेवढे तरी. मग खूप शोधाशोध केली नोकरीसाठी, आता १२वी पास मुलाला कोण काम देणार. मग सरळ एका कपड्याच्या दुकानात कामाला लागलो. पुढे ४ वर्षे मिळेल ती कामे न लाजता केली. शेवटी एका फोटोग्राफर काकांच्या दुकानात कामाला लागलो, ते काका थोडे वयस्कर होते. त्यांनाही कोणी कष्टाळू मदतनीस हवा होता. मग त्यांनी मला अगदी हाताला धरून एकेक करत बऱ्याच कौशल्याच्या गोष्टीची माहिती करून दिली. त्यांच्याकडून मीही या लाइनमधल्या सगळ्या बारीकसारीक गोष्टी मन लावून हुशारीने शिकलो. त्यांनी मला स्वत:च्या नावावर थोड्या ऑर्डर मिळवून द्यायला सुरुवात केली. माझा आत्मविश्वास खूप वाढत गेला."

"मग पुढे काय, त्यांनी त्यांचा स्टुडिओ तुला वापरायला दिला असेल ना?", मी सहज म्हटले.

"नाही हो मॅडम, तसं अगदी माझ्या मनात होतं. तो स्टुडिओ मी माझाच मानून खूप छान सांभाळला असता. पण या करोना काळात ते काका खूप आजारी होते. विचित्र आजारपणात त्यांचे खूप पैसे खर्च झाले. त्यांना मुलगा नाही. मुली लग्न होऊन सासरी गेल्या होत्या आणि त्यांना या धंद्यात रस नव्हता. मग त्यांना प्रश्न पडला दुकानाचे काय करायचं? यातच भरीत भर म्हणून दोन्ही मुलींकडेही प्रॉब्लेम झाले, त्यांनी वाटण्या मागितल्या. शेवटी काकांनी नाईलाजाने दुकान विकून मुलींची गरज भागवली. त्यादिवशी त्यांना आणि मलासुद्धा खूप वाईट वाटले, पण काही इलाज नव्हता, माझ्याकडे तरी कुठे एवढे पैसे होते त्यांना द्यायला? आता ते आणि काकी छोट्याशा घरात राहत आहेत. मी नेहमी भेटत असतो त्यांना. मग मी जवळच्या मित्राचा एक वापरात नसलेला गाळा घेतला भाड्याने आणि तिथेच आता काम सुरु ठेवले आहे. नशिबाने आणि तुमच्या सर्वांच्या आशिर्वादाने छोटी मोठी कामे सतत मिळताहेत. दिवस बिल्कुल रिकामा जात नाही. २ तरुण मुले माझ्याकडे काम करतात."

तो अथक बोलत होता आणि मी ऐकत होते. बोलत बोलत आम्ही बाहेर आलो. "मॅडम, ही पहा माझी छोटीशी गाडी. अगदी सुरुवातीला मस्त सायकलवरून गावभर फिरायचो. पण लग्न झाल्यावर एक दुचाकी आणि मागच्या वर्षी ही गाडी घेतली कर्ज घेऊन. चला, बसा मी तुम्हाला तुमच्या घरी सोडतो. पण त्याआधी माझ्या घरी जाऊ."

मी म्हटलं, "अरे खूप उशीर होईल मला घरी जायला. नंतर केव्हातरी पाहू."

पण त्याचा हाही आग्रह मला मोडवेना. आम्ही त्याच्या घरी गेलो. त्याने मग बायको, मुलांची सर्वांची ओळख करून दिली. मला आश्चर्य वाटले ते बेडवर बसलेल्या हसतमुख वृद्ध व्यक्तीकडे पाहून. "हे माझे मामा, वय वर्षे ७०. अजूनही मस्त हिंडतात फिरतात. थोडा वेळ दुकानावरही बसतात. आम्हा भावाबहिणीचे नीट बस्तान बसावे म्हणून त्यांनी लग्न नाही केले. उलट आमचेच संसार मार्गी लावले. आता आम्ही त्यांची पूर्ण काळजी घेतो.

"वाऽह, मामाजी, केवढा हा त्याग तुमचा..." मी मामांना हात जोडून

नमस्कार केला.

चहा घेता घेता प्रवीणने त्याने काढलेले काही खास फोटो अल्बम मला दाखवले. काही स्पर्धांमध्ये भाग घेऊन मिळविलेली बक्षिसे मला शोकेसमधून काढून दाखवली. त्याच्याकडचे महागातले कॅमेरे दाखवले.

"एकूण खूप मोठी मजल मारलीस तू प्रवीण...", मी कौतुकाने म्हणाले.

"मुलांना पण छान शिकव आता."

त्यांच्या हातावर खाऊसाठी पैसे ठेवून मी बाहेर पडण्यासाठी दाराशी आले. तेवढ्यात त्याची बायको हातात मोगऱ्याचा गजरा घेऊन आली.

"ताई, हा लावा तुम्ही, मग आपल्या अंगणात फोटो काढतील हे आपला."

आम्ही उभ्या राहिलो. "Smile प्लीज" म्हणत प्रवीणच्या कॅमेऱ्यात फोटो घेतला. आज कित्येक वर्षे झाली, मी तो फोटो जपून ठेवला आहे. त्या दिवशीच्या आठवणी मोगऱ्याच्या सुगंधासारखा अजूनही ताज्या आहेत.

******

प्रशासकीय वृत्त

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे महानिर्मिती कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांची आढावा बैठक संपन्न

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. २८ मे २०२२ रोजी महानिर्मिती कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मा.श्री. आनंद कोंत ह्यांनी कोराडी औ.वि. केंद्रातील मानव संसाधन विभागातील सर्व अधिकारी यांची आढावा बैठक सदर केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. अभय हरणे यांच्या अध्यक्षतेखाली घेतली. कोराडी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. हरणे आणि कोराडी प्रकल्पाचे मुख्य अभियंता मा.श्री. अनिल आष्टीकर ह्यांनी मुख्य महाव्यवस्थापक (मासं.) यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सदर बैठकीमध्ये मानव संसाधन विभागातील विविध विषयांचा आढावा घेऊन चर्चा करुन मार्गदर्शन केले. या बैठकीत उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. सुनील सोनपेठकर, उप महाव्यवस्थापक (मासं) श्री. प्रकाश प्रभावत, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) श्री दिवाकर देशमुख, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) श्री. नत्थु ठाकरे, व्यवस्थापक (मासं) सौ. तृप्ती बावनकर आणि अन्य सर्व संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

या प्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. कोंत ह्यांनी नुकतेच नुतनीकरण झालेल्या मानव संसाधन विभागाला भेट दिली व सर्व कर्मचाऱ्यांशी चर्चा केली व आलेल्या अभ्यागताचे प्रश्न समजावून घेऊन त्यावर योग्य निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. याप्रसंगी माहे मे २०२२ मध्ये सेवानिवृत्त झालेले कोराडी औ.वि. केंद्रातील उच्चस्तर लिपीक (वित्त व लेखा) श्री. रशीद अकबर सय्यद यांच्या सेवानिवृत्तीप्रित्यर्थ मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. कोंत यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सदर बैठकीचे आभार प्रदर्शन श्री. दिवाकर देशमुख यांनी मांडले.

सेवानिवृत्ती

## आम्ही आपले आभारी आहोत

### कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथून माहे मार्च २०२२ मध्ये सेवानिवृत्त होणारे अधिकारी-कर्मचारी :-

(१) श्री. सुभाष शांताराम भुरण - तंत्रज्ञ-२.

### खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त होणारे अधिकारी-कर्मचारी :-

**सप्टेंबर २०२१ :**

(१) श्री. भिमराव नामदेव बोंदरे - प्रभारक श्रेणी-२, बॉयलर बेसमेंट, संच क्र. ३/४, २१० मेगावॅट, (२) श्री. किसना नथ्थुजी ठाकरे - तंत्रज्ञ-१, ए.सी. प्लांट, संच क्र. २, २१० मेगावॅट.

**ऑक्टोबर २०२१ :**

(१) श्री. राजू छगन इरमलवार - उप कार्यकारी अभियंता, पी.सी.आर., संच क्र. १, २१० मेगावॅट, (२) श्री. उध्दव दत्तात्रेय कोठावदे - प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, जल प्रक्रिया विभाग, २१० मेगावॅट.

**नोव्हेंबर २०२१ :**

(१) श्री. प्रफुल्ला रामकृष्ण वानखेडे - कार्यकारी अभियंता, शिफ्ट इन्चार्ज, संच क्र. ३/४, २१० मेगावॅट, (२) श्री. सुबोध मधुकर दाणी - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, संचलन - १/२,२१० मेगावॅट, (३) श्री. सुभाष अजाबराव लाडसे, तंत्रज्ञ-१, विद्युत संधारण विभाग, २१० मेगावॅट.

**डिसेंबर २०२१ :**

(१) श्री. प्रमोद जागोजी धनविज - कार्यकारी अभियंता, शिफ्ट इन्चार्ज, पी.सी.आर. संच क्र. ३/४, २१० मेगावॅट.

**जानेवारी २०२२ :**

(१) श्री. केवलराम हंसराज भगत - मदतनीस, सी.डब्ल्यु. पंप हाऊस, संच क्र. ४, २१० मेगावॅट.

**मार्च २०२२ :**

(१) श्री. नंदकिशोर कृष्णराव सेवतकर - कार्यकारी अभियंता, पी.सी.आर, संच क्र. १ व २, २१० मेगावॅट, (२) श्री. सुनिल गजाननराव गावंडे - उप कार्यकारी अभियंता, सुरक्षितता विभाग, (३) श्री. अभय विष्णु तुपसुंदरे - दुय्यम आवेक्षक - १, स्थापत्य सुव्यवस्था विभाग वसाहत.

**एप्रिल २०२२ :**

(१) श्री. राजु किसनराव धावडे - कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ, जल प्रक्रिया विभाग, २१० मेगावॅट.

### नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त होणारे अधिकारी-कर्मचारी :-

**फेब्रुवारी २०२२ :**

(१) श्री. रविंद्र गणपत झांबरे - कार्यकारी अभियंता, संच क्र. ३.

**मार्च २०२२ :**

(१) श्री. अनिल भालेराव साळुंखे - उप कार्यकारी अभियंता, संच क्र. ४.

# कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात संपन्न















डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१व्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल २०२२ रोजी कोराडी विद्युत विहार कॉलनी व आजुबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले वाचनालयाचे उद्घाटन महानिर्मितीचे संचालक (मानव संसाधन) मा.श्री. मानवेंद्र रामटेके यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मा.श्री. मानवेंद्र रामटेके आणि सौ. रामटेके, कोराडी औ.वि. केंद्राचे (६६० मेगावॅट) मुख्य अभियंता मा.श्री. प्रकाश खंडारे आणि सौ. खंडारे, कोराडी औ.वि. केंद्र (२१० मेगावॅट) तसेच कोराडी प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजकुमार तासकर, मुख्य अभियंता (प्रकल्प) मा.श्री. अनिल आष्टीकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मा.श्री. पुरुषोत्तम वारजुरकर, स्वतंत्र मजदूर युनियनचे केंद्रीय उपाध्यक्ष मा.श्री. नरेंद्र जारोंडे व सामाजिक कार्यकर्ते ॲड. अतुल पाटील तसेच औ.वि. केंद्रातील अन्य वरिष्ठ अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटी कामगार व त्यांचे कुटुंबिय आणि वसाहतीतील रहिवाश्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सदर जयंतीदिनाचे औचित्य साधून प्रबोधनात्मक कार्यक्रम आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण करण्यात आले. त्याप्रसंगीची ही काही क्षणचित्रे.












## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात संपन्न










भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१व्या जयंती दिनाचे औचित्य साधून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण करण्यात आले. त्याप्रसंगीची ही काही क्षणचित्रे.





कोराडी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. अभय हरणे यांचे अध्यक्षतेखाली महानिर्मिती कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मा.श्री. आनंद कोंत यांच्या उपस्थितीत कोराडी औ.वि. केंद्रातील मानव संसाधन विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. तसेच मे २०२२ मध्ये सेवानिवृत्त होणारे उच्चस्तर लिपीक (वित्त व लेखा) श्री. रशीद अकबर सय्यद यांचा सेवानिवृत्तीप्रित्यर्थ मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.





दि. १ मे २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिन संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.

## पारस औ.वि. केंद्रात महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिन उत्साहात संपन्न



दि. १ मे २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्त व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.



## तिलारी जल विद्युत केंद्र येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी आरोग्यविषयक उपक्रम संपन्न





दि. ८ मार्च २०२२ रोजी तिलारी विभागीय कार्यालयामार्फत तिलारी वसाहत येथे ज.वि. केंद्रातील कार्यरत महिला अभियंत्या व कर्मचारी तसेच वसाहतीतील महिला व मुली यांचेसाठी जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

## कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी आरोग्यविषयक उपक्रम संपन्न









दि. ८ मार्च २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी उपस्थित महिलांना डॉ. रुपाली चव्हाण यांनी ताण व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. वुमन्स वेल बिईंग कोयना शिबिरांतर्गत कोयना ज.वि. केंद्र संकुलातील महिला अधिकारी, कर्मचारी व बाह्यस्त्रोत महिला कर्मचाऱ्यांची माफक दरात शारिरीक तपासणी तसेच दि. १० मार्च रोजी केंद्रातील व वसाहतीतील महिलांची आरोग्य तपासणी करुन तज्ञांनी मार्गदर्शन केले. कोयना ज.वि. केंद्रातील आस्थापनेवरील कार्यरत महिला अधिकारी-कर्मचारी यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव म्हणून प्रशस्तीपत्रक व पुस्तिका देऊन सन्मान करण्यात आला, त्याप्रसंगीची ही काही क्षणचित्रे.









जागतिक योगा दिनाच्या निमित्ताने महानिर्मितीच्या सांताक्रुझ वसाहतीमध्ये मुलांसाठी योगा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध वयोगटातील मुलामुलींनी योगासने, सूर्यनमस्कार यांचे उत्तम प्रात्यक्षिक केले, आणि योग गीते सादर केली यावेळी श्री. नितीन जोगळेकर व श्री. राहुल सोहनी यांनी संगीत साथ दिली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. वैशाली पाटील आणि सूत्रसंचलन सौ. सुजाता सोहनी यांनी केले. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.



दि. १४ एप्रिल २०२२ रोजी खापरखेडा औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



दि. १२ मार्च २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथे मुख्य अभियंता मा.श्री. एस.जी. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



दि. २३ मार्च २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. एच.के. अवचार यांच्या अध्यक्षतेखाली शहीद दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



दि. ११ एप्रिल २०२२ रोजी खापरखेडा औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



दि. १२ जानेवारी २०२२ रोजी खापरखेडा औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली माँ. जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद **यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला**, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.




दि. २३ मार्च २०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शहीद दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.





दि. २३ मार्च २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथे मुख्य अभियंता मा.श्री. एस.जी. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली शहीद दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी सहाय्यक अभियंत्या (एम.पी.डी.) सौ. अंजली समुद्रे यांनी शहीद भगतसिंह, सुखदेव व राजगुरु यांच्या जीवनकार्याबाबतची सविस्तर माहिती सादर केली, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.

## महानिर्मितीचा १७वा वर्धापन दिन मुख्य सांघिक कार्यालय प्रकाशगड येथे उत्साहात संपन्न





महानिर्मितीच्या १७व्या वर्धापन दिनानिमित्त महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांनी महानिर्मितीच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांशी मार्गदर्शनपर संवाद साधला. या प्रसंगी मुख्यालय येथील जनसंपर्क विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या "महानिर्मितीची यशोगाथा" या चित्रफितीचे प्रदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. भीमाशंकर मंता यांनी केले. याप्रसंगी मागील तीन वर्षातील महानिर्मितीच्या कामगिरीचा आढावा त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजुरकर तसेच पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचलन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. विलास हिरे, औद्योगिक संबंध अधिकारी यांनी मांडले.






# गौरव - अभिनंदन



सांघिक कार्यालय, मुख्यालय, मुंबई येथे लेखाधिकारी (वित्त व लेखा) या पदावर कार्यरत असलेल्या सौ. सुवर्णा जाधव यांचा चिरंजीव सुकांत जाधव हा मे २०२२ मध्ये डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक येथून वैद्यकीय पदवी (MBBS) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला.



पारस औष्णिक विद्युत केंद्रात उप-कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. विकास बबनराव फुलाने यांची कन्या कु. स्पृहा विकास फुलाने ही पैदा स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे पहिल्या वर्गात शिकत असून इंटरनॅशनल ऑलिम्पियाड स्पर्धेत इंग्लिश व गणित या विषयामध्ये सुवर्ण पदक; बुद्धिमत्ता व अंकगणित चाचणीमध्ये कांस्य तसेच विज्ञान व हिन्दी विषयामध्ये रौप्य पदक तिने प्राप्त केले आहे. सदर स्पर्धा इंटरनॅशनल ऑलिम्पियाड फाऊंडेशन, नवी दिल्लीद्वारे संपूर्ण भारतात शिकत असलेल्या विविध विषयामध्ये पारंगत असलेल्या मुलांची स्पर्धा राबविली जाते.




महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय रक्तदाता गौरव सन्मान या कार्यक्रमात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा.श्री. राजेश टोपे यांचे हस्ते चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रास राज्यस्तरीय रक्तदाता गौरवाने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मा. महानिर्मितीचे संचालक मा.श्री. चंद्रकांत थोटवे, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-१) मा.श्री. राजेश मोराळे व चंद्रपूर महाऔ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री पंकज सपाटे यांनी स्वीकारला.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे पी.ओ.जी. ५०० मेगावॅट येथे तंत्रज्ञ-३ या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी श्री. स्वप्निल सुभाष पाटील यांना भुसावळ औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. विजय राठोड यांच्या हस्ते गुणवंत कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# महानिर्मितीच्या विक्रमी कामगिरीची वृत्तपत्रांनी घेतलेली व्यापक दखल

आपलं महानगर | My महानगर .com

## ६० वर्षांतील ऐतिहासिक वीजनिर्मिती

'मिशन ८००० मेगावॅट': महानिर्मितीच्या ७ औष्णिक वीज प्रकल्पातील सर्व २७ संच कार्यरत

प्रातःकाल
www.pratahkal.com
मुंबई, बुधवार दि. २७ एप्रिल २०२२

## वाढत्या वीजमागणीच्या काळात महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची अथक विक्रमी वीजनिर्मिती

## वाढत्या वीजमागणीच्या काळात महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची अथक विक्रमी वीजनिर्मिती

## MahaGenco sets a record to operate all 27 units 7761 mw

SANJAY JOG

The state-run MahaGenco (Maharashtra Power Generation Company) on Wednesday set a new record under the thermal mission wherein all its 27 units operated to generate 7,761 MW. MahaGenco, which has a capacity of 9,930 MW, is currently facing a coal shortfall amid rising demand which has touched 28,000 MW.

A MahaGenco officer told the Free Press Journal, "It's historical; of the 27 units, the Chandrapur plant has seven units, Koradi four, Nashik, Bhusawal and Parli three units each, Khaparkheda has five units and Paras two units."

He said this was also possible as the MahaGenco had strictly followed the time table for upkeep, maintenance and repair schedule of all these 27 units.

**MahaGenco, which has a capacity of 9,930 MW, is currently facing a coal shortfall amid rising demand which has touched 28,000 MW**

Meanwhile, the MahaVitaran on Wednesday said it has not been carrying out load shedding since the last seven days in view of micro planning to meet the rising demand. MahaVitaran from April 21 has resumed uninterrupted power supply to agriculture consumers for eight hours each during day and night. It supplied 23,794 MW of power, excluding Mumbai, on Wednesday.

## वाढती वीजमागणी : महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात विक्रमी वीजनिर्मिती

कृषीवल | संमिश्र

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची विक्रमी वीजनिर्मिती

## महानिर्मिती की ऐतिहासिक कामयाबी

सभी २७ औष्णिक यूनिट से विद्युत निर्मिती संभव

देशोन्नती

## चंद्रपूर केंद्रात विक्रमी वीज उत्पादन

Nagpur Edition
Apr 27, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

## CSTPS' record performance keeps load-shedding at bay

Staff Reporter

(Contd on page 2)

## वाढत्या वीजमागणीच्या काळात महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची अथक विक्रमी वीजनिर्मिती

लोकमत

## महानिर्मितीने ओलांडला ८ हजार मेगावॅटचा टप्पा

विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मिशन फत्ते

मतदार अमरावती

वाढत्या वीजमागणीच्या काळात मोठा दिलासा

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची विक्रमी वीजनिर्मिती

## CSTPS' record performance keeps...

## महानिर्मितीची ऐतिहासिक कामगिरी - सर्व २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती साध्य

## महानिर्मितीची ऐतिहासिक कामगिरी सर्व २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती साध्य

## चंद्रपूर में रिकॉर्ड उत्पादन

## बढ़ती बिजली की मांग के बीच महानिर्मिति के चंद्रपुर कोल पावर स्टेशन में अधिक बिजली उत्पादन

३ साल पहले बीज क्या किसी बड़ी दु...

तरुण भारत

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची विक्रमी वीजनिर्मिती

तरुण भारत अमरावती

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची विक्रमी वीजनिर्मिती

लोकमत

## २७ औष्णिक संच चालवून महावितरणने रचला इतिहास

राज्यात पहिल्यांदाच सर्व संचांतून होतेय वीजनिर्मिती

# महानिर्मितीच्या विक्रमी कामगिरीची वृत्तपत्रांनी घेतलेली व्यापक दखल

## २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती साध्य; महानिर्मितीची आज ऐतिहासिक कामगिरी

मुंबई – आज दिनांक २७ एप्रिल रोजी महानिर्मितीच्या इतिहासात एक अनमोल कामगिरी साध्य झाली आहे. राज्यामध्ये सातत्याने वाढत्या विजेच्या मागणीच्या पार्श्र्वभूमीवर महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक केंद्र येथील ७ औष्णिक संच, कोराडी येथील ४ संच, तसेच नाशिक, भुसावळ व परळी येथील प्रत्येकी ३ संच, खापरखेडा येथील ५ संच व पारस येथील २ अशा एकूण २७ औष्णिक संचामधून लक्षणीय वीजनिर्मिती सुरु आहे. सर्वच्या सर्व २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती सुरु असण्याची महानिर्मितीच्या सुमारे ६० वर्षांच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. राज्यातील विजेच्या वाढत्या मागणीच्या पार्श्र्वभूमीवर मा.ना. मुख्यमंत्री तसेच मा.ना. ऊर्जा मंत्री यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार महानिर्मितीने मिशन ८००० मेगावॅट हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत आपले सर्व संच कार्यरत कसे राहतील याकडे प्रकर्षाने लक्ष दिलेले असून हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व संचांच्या उपलब्धतेकडे विशेष भर दिला आहे. त्याचप्रमाणे औष्णिक संचांच्या देखभाल-दुरुस्तीच्या वेळापत्रकाचेही काटेकोर नियोजन साध्य केलेले आहे.

कोळसा टंचाईच्या विपरीत परिस्थितीत महानिर्मितीच्या वरिष्ठ व्यवस्थापन – अभियंते, तंत्रज्ञ व कर्मचारी यांच्या सांघिक प्रयत्नातून ही कामगिरी साध्य झाली आहे. हा विक्रमी टप्पा गाठल्याबद्दल मा. उर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. संजय खंदारे यांचे व महानिर्मितीच्या चमूचे अभिनंदन केले आहे.

## महानिर्मितीची आज ऐतिहासिक कामगिरी–सर्व २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती

मुंबई : महानिर्मितीच्या इतिहासात दिनांक २७ एप्रिल रोजी एक अनमोल कामगिरी साध्य झाली आहे. राज्यामध्ये सातत्याने वाढत्या विजेच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक केंद्र येथील ७ औष्णिक संच, कोराडी येथील ४ संच, तसेच नाशिक, भुसावळ व परळी येथील प्रत्येकी ३ संच, खापरखेडा येथील ५ संच व पारस येथील २ अशा एकूण २७ औष्णिक संचामधून लक्षणीय वीजनिर्मिती सुरु आहे. सर्वच्या सर्व २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती सुरु असण्याची महानिर्मितीच्या सुमारे ६० वर्षांच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे.

राज्यातील विजेच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री तसेच ऊर्जा मंत्री यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार महानिर्मितीने मिशन ८००० मेगावॅट हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत आपले सर्व संच कार्यरत कसे राहतील याकडे प्रकर्षाने लक्ष दिलेले असून हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व संचांच्या उपलब्धतेकडे विशेष भर दिला आहे. त्याचप्रमाणे औष्णिक संचांच्या देखभाल-दुरुस्तीच्या वेळापत्रकाचेही काटेकोर नियोजन साध्य केलेले आहे. कोळसा टंचाईच्या विपरीत परिस्थितीत महानिर्मितीच्या वरिष्ठ व्यवस्थापन – अभियंते, तंत्रज्ञ व कर्मचारी यांच्या सांघिक प्रयत्नातून ही कामगिरी साध्य झाली आहे. हा विक्रमी टप्पा गाठल्याबद्दल मा. उर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय खंदारे यांचे व महानिर्मितीच्या चमूचे अभिनंदन केले आहे.

## महानिर्मितीची दिवसभरात २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती

### चंद्रपूर वीज केंद्राची विक्रमी वीजनिर्मिती

कोकण सकाळ

## महानिर्मितीने पुन्हा एकदा साध्य केली ८,००० मेगावॅट औष्णिक वीजनिर्मिती

आपलं महानगर

## चंद्रपूर वीजकेंद्राची विक्रमी वीजनिर्मिती

## महानिर्मितीची ऐतिहासिक कामगिरी

### २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती साध्य

सकाळ

## चंद्रपूर केंद्राची विक्रमी वीजनिर्मिती

वाढत्या वीज मागणीच्या काळात सात संचांद्वारे अखंड निर्मिती



## महानिर्मितीच्या सर्व औष्णिक वीज संचातून वीजनिर्मिती

मुंबई : विजेच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर महानिर्मितीने आज ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आपल्या सात औष्णिक वीज केंद्रातील सर्व २७ वीज संचामधून सात हजार मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती केली आहे. राज्यातील विजाची मागणी सातत्याने वाढत असल्याने ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली महानिर्मितीने आठ हजार मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार महानिर्मितीच्या चंद्रपूर औष्णिक केंद्रातील ७ संच, कोराडी येथील ४, नाशिक, भुसावळ व परळी येथील प्रत्येकी ३ संच, खापरखेडा येथील ५, पारस येथील २ अशा एकूण २७ संचातून आज सात हजार मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती केली आहे. कोळसाटंचाई असतानाही महानिर्मितीने चोख नियोजन करत सर्व संचातून वीजनिर्मिती करत ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

### वाढत्या वीज मागणीच्या काळात महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची अखंड विक्रमी वीजनिर्मिती

मराठी दैनिक प्रात:काल

## २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती करण्यास यश

### महानिर्मितीची ऐतिहासिक कामगिरी

प्रहार

## २७ औष्णिक संचांमधून वीजनिर्मिती करण्यास यश

महानिर्मितीची ऐतिहासिक कामगिरी



## प्रथमच महाराष्ट्रातील सर्व वीजनिर्मिती संच कार्यान्वित

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



## प्रथमच महाराष्ट्रातील सर्व वीजनिर्मिती संच कार्यान्वित

### भारनियमन कायम

लोकमत

## २७ आकड्यांतील योगायोगाची 'महानिर्मिती'

बुधवारचा शुभशकुन : मागणी, निर्मिती आणि तारखेत साम्य; एकसष्टव्या तीनही संचांमधून वीजनिर्मिती

## सीटीपीएसमधून विक्रमी वीजनिर्मिती

म. टा. वृत्तसेवा, चंद्रपूर

महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात मागील २३ दिवसांपासून सातही संचांमधून अखंड वीजनिर्मिती करीत विक्रमी कामगिरी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वी डिसेंबर २०१८मध्ये या केंद्रातील सर्व संच सलग २१ दिवस कार्यरत होते.

सद्यःस्थितीत चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची स्थापित क्षमता २ हजार ९२० मेगावॅट इतकी आहे. या केंद्रात ५०० मेगावॅटचे पाच तर २१०चे दोन संच कार्यरत आहेत. आजतागायत या सातही संचांमधून ४ एप्रिलपासून अहोरात्र वीजनिर्मिती सुरू आहे. १ ते

### सलग २३ दिवसांपासून सातही संचांचे कार्य

२५ एप्रिलदरम्यान या केंद्राने एकूण १ हजार ३३४ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मिती केली. चंद्रपूरचे केंद्र देशातीलच नव्हे तर आशियातील विख्यात महाऔष्णिक वीज केंद्र आहे. या केंद्राने आजवर वीजनिर्मितीचे अनेक विक्रम नोंदविले आहेत. विशेष म्हणजे, महानिर्मितीच्या सातही वीजनिर्मिती केंद्रांमध्ये चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातून निर्माण होणारा विजेचा दर हा सर्वात स्वस्त आहे. या केंद्रातून अधिकाधिक वीजनिर्मिती साध्य झाल्याने राज्यातील वीजग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

सकाळ

## महानिर्मितीच्या २७ संचांमधून वीजनिर्मिती

६० वर्षांत पहिल्यांदाच सर्व संचांमधून निर्मिती; नाशिकचा तिसरा संचही कार्यान्वित

# उरण वायु विद्युत केंद्राचा ४०वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न









उरण वायु विद्युत केंद्राच्या ४०व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून मुख्य अभियंता मा.श्री. गिरीश कुमारवार यांचे अध्यक्षतेखाली वीज केंद्रातील अधिकारी-कर्मचारी तसेच वसाहतीतील विद्यार्थी व रहिवाश्यांसाठी विविध क्रीडा-शैक्षणिक-सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.







उरण वायु विद्युत केंद्राच्या ४०व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित विविध स्पर्धांमधील उपविजेता व विजेता यांना पारितोषिक व चषक वितरीत करण्यात आले. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

























पर्यावरणपूरक वीजनिर्मितीसाठी आणि ऊर्जा संसाधनांच्या नूतनीकरणासाठी महानिर्मितीचा जर्मनी आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये सामंजस्य आंतरराष्ट्रीय करार संपन्न झाला, याप्रसंगी ऊर्जा मंत्री मा.डॉ. नितीन राऊत, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे तसेच सर्व संचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताहानिमित्त सुरक्षिततासंबंधी जनजागृतीचे कार्यक्रम संपन्न



















परळी औष्णिक विद्युत केंद्रात दि. ४ ते १० मार्च २०२२ या कालावधीत परळी औ.वि. केंद्रात ५१व्या राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताहानिमित्त वेगवेगळ्या सुरक्षिततासंबंधी जनजागृतीचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना सुरक्षिततेचे महत्व पटवून देण्यासाठी "सेफ्टी की धडाकेबाज" हे पथनाट्य सादर केले. परळी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड ह्यांनी उपस्थित औ.वि. केंद्रातील विभागप्रमुख, अभियंते, अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी, कंत्राटी कामगार, कंत्राटदार यांना सुरक्षिततेची शपथ दिली. तसेच सदर सप्ताहात सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना मान्यरांच्या हस्ते बक्षिस व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.





## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात अग्निशमन सेवा सप्ताह संपन्न













खापरखेडा औ.वि. केंद्रात सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. नितीन सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.




दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगेबाबा महाराज व संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.







दि. ११ एप्रिल २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्याबाबतची माहिती सादर केली, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी वृंद.











## परळी औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा ज्योतिबा फुले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न








परळी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डे-नाईट क्रिकेट लीग सामने, व्हॉलीबॉल स्पर्धा, सायकल रॅली, रक्तदान व तपासणी शिबीर, मुलींसाठी व महिलांसाठी विविध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, ग्रुप डान्स, प्रश्नमंजुषा, नाट्यप्रयोग, चित्रकला,टॅलेंट शो, रांगोळी स्पर्धा, आनंद नगरी व अन्य प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम तसेच व्याख्यानमाला इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर दिनी परळी औ.वि. केंद्रातील वरिष्ठ अधिकारी, अभियंते-कर्मचारी, महिला कर्मचारी, कंत्राटी कामगार व कंत्राटदार व त्यांचे कुटुंबिय तसेच वसाहतीतील रहिवाश्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.



दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी खापरखेडा औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगेबाबा महाराज व संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



परळी औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. एच के. अवचार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



दि. ३ जानेवारी २०२२ रोजी खापरखेडा औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



खापरखेडा औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.




पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विट्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी वृंद.




पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विट्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी वृंद.




दि. २१ मे २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विट्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसानिमित्त शपथ ग्रहण कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.

## कलेचा सन्मान

कुणी बोलणार आहे,
कुणी हसणार आहे,
बोलण्याने होऊ दे जखमा,
माझा छंद मी जपणार आहे.

कधी मला रोखणार आहे,
कधी मला टोकणार आहे,
माझ्या कलेचा सन्मान मी,
कायमच राखणार आहे.

गेले ते बालपण, गरीबी अन् तरूणपण,
विसरु कसा मी, अपमानाचे एक एक क्षण,
नाही मिळाले ते, मी आता मिळवणार आहे,
नियतीसुध्दा त्यांना एक दिवस चिडवणार आहे,
फिके पडतात तेव्हा, जेव्हा मी जिंकणार आहे,
माझ्या कलेचा सन्मान मी, कायम राखणार आहे.

समाजात टोकणारे, प्रगती माझी रोखणारे,
कधी निंदा करुन, पाठीमागे कधी भुंकणारे,
तसा मी सोसणार आहे, आवड जोपासणार आहे,
कधी शिकणार मी तर कधी शिकवणार आहे,
फिके पडतात तेव्हा, जेव्हा मी जिंकणार आहे,
माझ्या कलेचा सन्मान मी, कायम राखणार आहे.

**– राजेश अंबादास पवार**
**उप व्यवस्थापक (वित्त व लेखा),**
**भुसावळ औ.वि. केंद्र**





## म्हातारपण

टक्कल पड़ते।
दातही पडते
तुम्ही कसे काऊन
आबा फर्मात आते

वय नाही तुमचे
मोकळ फिरायचे
काठी आधाराला
टेकवित जायचे

पसा ही मध्येमध्ये
आवाज येतो जातो
जणू विप ?ती टीव्ही
चित्र जाऊन येतो

वय नाही तुमचे
मौज मजा कराये।
हात पाय मोडते
ना कधीच जुटावे

तोड तुमचे फोडून
नका आबा घेऊ
दात परत न यायचे
सांगा थोडे भाऊ

**– राजेश लक्ष्मण वऱ्हाडे**
**एम. आय. एस. विभाग**
**पारस औ.वि. केंद्र**

## जब भी मै निकलू काम पे...

जब भी मै निकलू काम पे जब,
पहुँचना है तब धाम पे जब..

मिले दोस्त-यारों के संग तब,
होती है बाते सारे मिले जब...

कोई बडे - तो कोई बराबर के,
चली बस तो प्रकृती के हुए दर्ष,

बंबईयाँ का जब भी देखू सब दर्ष...
लगे कोई भवंडल है यहा सब,
आई यात्रा की गाडी में तो बैठे हम सब...

जाने क्यों भक्ति का स्वर सुनु मैं जब,
मन की अशांती को शांत करे
मोबाईल के स्वर या रेडियो के गीत...

यात्रा की आवाज छन-छन छन-छन होता है जब,
बोरी से बारा के बीच पढू हर क्षेत्र के नाम जब...

तब सफर हम सब का खतम होता है तब,
जब भी मै निकलू काम पे जब!

**– सागर सरागे**
**कनिष्ठ विभागीय लिपीक (ई.एस.टी.)**
**सांघिक कार्यालय, मुंबई.**





# कोयना धरण – पाण्यावरचा दिवा

कोण म्हणतं पाण्यावर
दिवा तेवत नाही !
गळयात पाळुनी साज विजेचा
हासते कोयनामाई !

महाबळेश्वरी गायमुखातुनी
अवतरली कोयना
महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी जणू
लखलखती चेतना!

स्मरण करुया सारेजण या
तिचीच गौरवगाथा
अखिल जगामध्ये झाला
उन्नत आपुला माथा!

सह्यगिरीच्यावरी होतसे
अपार पर्जन्यवृष्टी!
कुठे पूर तर कुठे अवर्षण
जनजीवन होते कष्टी

स्वातंत्र्य मिळाले देशाला अन
औद्योगिकरणे सुबत्ता
पडू लागली त्याचवेळी
विद्युत शक्तीची कमतरता

राज्यशासने मग हाती घेतला
महत्वाकांक्षी प्रकल्प
वीजनिर्मिती जलसिंचन असा
बहुउद्देशी संकल्प

लोकप्रतिनिधींनी दिला
पंतप्रधानांसी प्रस्ताव
अथक प्रयत्ने पास झाला
धरण मंजुरीचा ठराव ...

विकाससन्मुख महाराष्ट्राने
स्वप्न एक पाहिले
पुर्ण ते करण्या – बांधव सारे
अहोरात्र झटले....

कितीजण ते मिळुनी आले
सोडवाया एक प्रश्न
श्रमाचा गोवर्धन उचलणार –
तो एक एक कृष्ण !

कितीकांनी केले श्रमदान
कितीकांनी दिल्या जमिनी
प्रतिविश्व ते जणू निर्मिले
अजस्त्र डोंगर पोखरुनी !

सहा वर्षे लोटली मग –
धरण आले आकारा!
नृत्यासाठी जणू मयूर फिरवी
पूर्ण क्षमतेने पिसारा !!

स्वयंचलित महाव्दारे
तंत्रज्ञानाची अदभुत किमया!
नतमस्तक होऊनी नाव द्यावे
सर मोक्षगुंडम विश्वश्वरैय्या !!

पाणी अडविता नदीचे
तुडुंब भरला शिवसागर
मुक्तकंठे सहयाद्री करितो
शिवछत्रपतींचा जागर !!

पर्यावरणपूरक प्रकल्प बांधुनि
जैववैविध्य जोपासले
अभयारण्यामध्ये कितीक –
वन्यजीव ते विसावले.

यशस्वीरित्या लेक टॅपिंग
अभियांत्रिकीचा करु सन्मान,
आशिया खंडामध्ये प्रथम
असा मिळवला बहुमान !

धरण जरी एकच, तरीही
विशेष याची ख्याती,
पाण्याचा पुनर्वापर करुनी,
अनेक ठिकाणी – वीजनिर्मिती!

स्तिमित झाली, कोयना,
विसरुनी डोळ्यांमधली नीज,
प्रसन्न झाली प्रयत्नांनी
ती हिरण्यगर्भा वीज !

हा पाण्यावरचा दिवा
असाच तेवत रहावा,
रोमांचकारी इतिहास याचा,
पिढ्यान्पिढ्यांनी गावा!

श्रीमंत झाला महाराष्ट्र
किर्ती दिगंतरा जाई,
गळ्यात घालुनी साज विजेचा
हासते कोयनामाई!

कोण म्हणतं पाण्यावर
दिवा तेवत नाही
गळ्यात घालुनी साज विजेचा
हासते कोयनामाई!

– सौ. नमिता काणेकर
पोफळी

# निसर्ग

ये संसार इतना अदभुत क्यूँ !
पौधे – पेड इतने सुंदर क्यूँ !

जब भी देखूँ इस दुनिया को
लगती इतनी अच्छी क्यूँ !


पंछियों की हर आवाज मे
इतने मधुर स्वर है, क्यूँ !

जो भी सुने इस मधुर वाणी
है निसर्ग इतनी प्यारी तू!

जब भी देखे इस ऋतुओ को
गरमी, ठंडी, बारीश है तू!

जो भी देखे इस चित्र को,
ये निसर्ग इतनी प्यारी है तू!

– सागर सरागे,
कनिष्ठ विभागीय लिपीक (इ.एस.टी.)
सांघिक कार्यालय, मुंबई.





## परिपूर्ण तरी अपूर्णच ती...

आधी असते ती एक मुलगी,
मग होते ती कुणाची भगिनी,
एका मैत्रिणीच्या रुपात असते ती मैत्री,
नंतर होते ती एका पतीची पत्नी,
काही वर्षांनी होते ती माऊली,
आपल्या मुलांना असते ती विसाव्याची सावली.
कार्यालयात असते तेव्हा असते ती कर्मचारी,
बढती घेत घेत कधीतरी होते ती अधिकारी.
सगळ्या लहान बाळांची असते ती
कधी काकी, कधी मावशी,
एक दिवस होते ती आपल्या नातवांची आजी.
या सगळ्या जबाबदाऱ्या निभावता निभावता
थकते एकदा ती बिचारी,
मग एकदाच काय ती जाते देवाघरी माहेरी.
इतके करुनही कुठल्या तरी
जबाबदारीत पडते ती कमी,
म्हणूनच संपूर्ण असूनही अपूर्णच असते,
अशी ही एक ती, अशी कोणीतरी ही...

**- सौ. सोनिया भागवत केळकर**
**मुख्य लिपीक,**
**धारावी कार्यालय, मुंबई.**

## गप्पांची बियर

असेच भेटतो
रंगते गप्पांची लहर
आठवणींच्या गर्दीला हव्या
फक्त चार बियर

सुरुवातीला खरेच
बोलणे फॉर्मल फार
एक एक पेग बरोबर
जुळते शब्दांची तार

हळूच मग कोणी छेडतो
एक विषय जो हरवलेला
मग शांत थोडे वातावरण
जणु कोणी गेला

मग त्या विषयाचे
हळूच बनते मोठे घर
आठवणींच्या गर्दीला हव्या
फक्त चार बियर

मग हळू हळू लागतो
एक एक बोलू
बोलण्याच्या भरात लागतो
मागे थोडे सरकु

कोणी जातो दूर दिवसात
दूर राहिलेल्या काही स्वप्नात
आज जरी सुखाची थंडी
मन तरीही तापलेल्या उन्हात

मग हळूच डोळयांवर
थोडया पावसाचा थर
आठवणीच्या गर्दीला हव्या
फक्त चार बियर



आज प्रत्येकाचे वय
पुन्हा दहा वर्षांनी कमी
हरवलेल्या आठवणींचा पुन्हा
जमते गोड रमी

मग कोणा दिसतो
कॉलेजचा तो कटटा
बसून हाकलेल्या
त्या ढिगभर गप्पा

शेवटी काय सांगू मित्रा
त्या कॉलेज क्विनचा कहर
आठवणीच्या गर्दीला हव्या
फक्त चार बियर

मग कोणास दिसते
दूर राहिलेले तिचे गाव
जगण्याच्या वाटेवर भेटले खूप
तरीही आठवणीत तिचेच नाव

कोणी हसतो
कोणी हसवतो
तर कोणी त्या गर्दीतही
कुठे एकटाच असतो

अशा अनेकांच्या असण्यात
रंगते एक वेगळेच शहर
आठवणीच्या गर्दीला हव्या
फकत चार बियर.

**- प्रवीण दिलीप भोईर**
**व्यवस्थापक (वित्त व लेखा),**
**सांघिक कार्यालय, मुंबई**

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार उत्साहात संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सर्वप्रथम मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण करण्यात आले आणि त्यानंतर सामुहिक राष्ट्रगीत संपन्न झाले.

या कार्यक्रमास सर्व उप मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते, सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, संघटना प्रतिनिधी, कंत्राटदार व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेची खबरदारी बाळगत व शासनाच्या नियमांचे पालन करुन सदर कार्यक्रम संपन्न झाला.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे सोमवार, दि. १२ जानेवारी, २०२२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली

यावेळी सर्वप्रथम खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे, यांचे शुभहस्ते जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. याप्रसंगी उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. जितेंद्र टेंभरे, अधीक्षक अभियंता श्री. अनिल काठोये आणि अन्य वरिष्ठ अभियंते-तंत्रज्ञ, अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) श्री. अमरजीत गोडबोले यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. २८ मे २०२२ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन दिपप्रज्वलन करण्यात आले व त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

या अभिवादनपर कार्यक्रमाच्या प्रसंगी पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे हे अध्यक्षस्थानी तर प्रमुख उपस्थिती म्हणून उप मुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंता श्री. धनंजय पंधाडे, प्रभारी अधीक्षक अभियंता राजेश गट्टूवार लाभले होते तर अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. निलय महाजन आणि अन्य अधिकारी-कर्मचारी वृंद यावेळी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक २५ मे २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम मुख्य अभियंता मा.श्री. खटारे यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले व तद्नंतर महाराणा प्रताप यांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उप मुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंते सर्वश्री. धनंजय पंधाडे, संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता राजेश गट्टूवार आणि अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, अभियंते-तंत्रज्ञ, महिला कर्मचारी व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मथुर मेंढेकर यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक २१ मे २०२२ रोजी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसानिमित्त शपथ ग्रहण करण्यात आली. सदर कार्यक्रमात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांनी उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ दिली.

या प्रसंगी अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे, प्रमुख उपस्थिती म्हणून उप मुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, श्री धनंजय पंधाडे, अधीक्षक अभियंता श्री. संजय कांबळे, तसेच कार्यालयातील अन्य वरिष्ठ अभियंते-तंत्रज्ञ, अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी वृंद आणि कंत्राटी कामगार उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यानी केले.

# कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथील टप्पा क्र १ व २ चा ६० वा वर्धापन दिन (हिरक महोत्सवी वर्ष) आणि टप्पा क्र ४ चा २० वर्धापन दिन उत्साहात संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र संकुल पोफळी येथील टप्पा क्र १ व २ चा ६० वा वर्धापन दिन (हिरक महोत्सवी वर्ष) आणि टप्पा क्र ४ चा २० वर्धापन दिन सोहळा मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

या वर्धापन दिनानिमित्त कोयना जल विद्युत केंद्र संकुल पोफळी येथे कार्यरत अधिकारी/कर्मचारी/ प्रकल्पग्रस्त/ प्रशिक्षणार्थी/ प्रशिक्षणार्थी उमेदवार/ कंत्राटी कर्मचारी यांच्याकरिता अंतर्गत विभागीय विविध खेळ स्पर्धा दिनांक १३ मे ते १४ मे २०२२ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धामध्ये प्रामुख्याने क्रिकेट- अंडरआर्म (दिवसरात्र) बॅडमिंटन, कॅरम आणि टेबल टेनिस अशा विविध स्पर्धामध्ये पुरुष आणि महिला कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदवून आपल्या विविध खेळातील कौशल्य प्रदर्शित केले. तसेच कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरिता इयत्ता ५ वी ते १०वी मधील मुले व मुलींकरिता चित्रकलेच्या स्पर्धा, अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे दिनांक १६.०५.२०२२ रोजी टप्पा क्र. १ व २ आणि टप्पा क्र. ४ येथे सत्यनारायणाची महापूजा यंत्रपूजा, आणि तीर्थप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पूजेच्या ठिकाणी टप्पा क्र. १ व २ आणि टप्पा क्र. ४ येथील कार्यरत तंत्रज्ञ कलाकारांनी सुबक रांगोळी काढून आकर्षक विद्युत रोषणाईमुळे परिसरामध्ये झगमगाट झाली होती. तसेच ज्या ठिकाणी पूजा मांडण्यात आली होती, त्यांच्या पाठीमागच्या बाजूस अत्यंत सुंदर असा किल्ल्यांचा देखावा करण्यात येऊन त्यामध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा उभी करण्यात येऊन सजावट करण्यात आली होती. त्याचप्रमाणे भगवान शिवशंकर यांचा सुध्दा अप्रतिम असा कारंजासह सुंदर देखावा करण्यात आला होता.

तसेच मनोरंजनगृह येथे दुपारी १२.०० ते २.०० यावेळेत वर्धापन दिन (हिरक महोत्सवी वर्ष) निमित्त कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय आणि प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थी / प्रशिक्षणार्थी उमेदवार / कंत्राटी कर्मचारी यांच्यासह सहकुटुंब सहपरिवार स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा सर्व कर्मचारी आणि सहकुटुंबाने आस्वाद घेतला.

दिनांक १६ मे २०२२ रोजी सायंकाळी ८.०० वाजता मनोरंजनगृह येथे मुख्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळयात वर्धापन दिनानिमित्त आयोजित स्पर्धांच्या उपविजेता व विजेता यांना पारितोषिक चषक आणि बक्षिस वितरण कार्यक्रम पार पाडला. यावेळी मंचावर मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे, अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. राजेश कुंभार, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र १ व २) श्री. राजीव रेड्डी, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र ४) श्री. अजय शिंदे, कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम हे उपस्थित होते. त्यानंतर मुख्य अभियंता मा.श्री. चोपडे यांनी आपले अध्यक्षीय मनोगतात, "कोयना जल विद्युत केंद्र नेहमी वीज उत्पादनात असे विक्रमी उच्चांक गाठत राहो", असे प्रतिपादन केले. वर्धापन दिन आयोजनाची जबाबदारी उत्तमपणे पार पाडली त्याबद्दल कोयना जल विद्युत केंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांना वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आणि सर्वाचे अभिनंदन करुन विविध स्पर्धात उत्साहाने सहभाग नोंदवून अत्यंत चांगल्या रितीने आणि आनंदाच्या वातावरणात वर्धापन दिन साजरा केल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

कोयना जल विद्युत केंद्राचा टप्पा क्र. १ व २ चा वर्धापन दिन (हिरक महोत्सवी वर्ष) आणि टप्पा क्र. ४ वर्धापन दिनानिमित्त महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे, संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (मासं) मा.श्री. मानवेंद्र रामटेके आणि सर्व कार्यकारी संचालक सर्व वीज केंद्रातील मुख्य अभियंता व मुख्य महाव्यवस्थापक, मुख्यालयातील सर्व विभाग प्रमुख यांचे शुभेच्छा संदेश प्राप्त झाले, त्याचे वाचन श्री. राजेश कुंभार, अधीक्षक अभियंता (प्रशासन) यांनी केले. त्याचप्रमाणे स्थानिक पत्रकार, पोफळी गावांमधील जेष्ठ नागरिक, ग्रामपंचायत यांनी सुध्दा वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. सदर शुभेच्छा संदेशाबद्दल मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे यांनी सर्वांचे आभार मानले.

वर्धापन दिनानिमित्त मनोरंजनात्मक आणि विशेष आकर्षण म्हणून हेरंब प्रस्तुत मुंबई कलाविष्कार यांच्या मार्फत महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारा "गर्जतो मराठी" या अत्यंत सुंदर अशा लोककला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथील अधिकारी / कर्मचारी / प्रकल्पग्रस्त उमेदवार / कंत्राटी कर्मचारी आणि त्यांच्यासह कुटुंबियांनी आणि पोफळी गावांतील ग्रामस्थांनी या मनोरंजनात्मक कार्यक्रमातील कलाकारांस भरभरुन दाद देऊन कार्यक्रमाचा सर्वांनी आनंद घेतला व सदर सोहळ्याची सांगता करण्यात आली.

कोयना जल विद्युत केंद्राच्या टप्पा क्र. १ व २ चा ६०वा वर्धापन दिन (हिरक महोत्सवी वर्ष) आणि टप्पा क्र. ४ चा २०वा वर्धापन दिनाचा सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे, अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. राजेश कुंभार, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. १ व २) श्री. राजीव रेड्डी, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. ३) श्री. ब्रम्हानंद कोष्टी, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. ४) श्री. अजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य वरिष्ठ अभियंते-तंत्रज्ञ, अधिकारी-कर्मचारी, महिला अधिकारी-कर्मचारी तसेच वर्धापन दिन समितीचे तसेच स्पर्धेचे आयोजक आणि टप्पा क्र. १, २ व ४ येथील वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, अभियंते-तंत्रज्ञ आणि महिला अधिकारी-कर्मचारी तसेच कंत्राटी कामगार या सर्वांनी वर्धापन दिन (हिरक महोत्सवी वर्ष) सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यास अथक परिश्रम घेतले.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात अग्निशमन सेवा सप्ताह संपन्न

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र (२×२१० मेगावॅट आणि ३×६६० मेगावॅट) येथे दि. १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२२ या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताहाअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गृह मंत्रालयाने दिलेल्या घोषवाक्याचे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील कापडी बॅनर्स वसाहत व महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आले होते. तसेच विविध माध्यमांद्वारे आवश्यक ती प्रसिध्दी देण्यात आली होती. विद्युत केंद्रातील प्रत्येक विभागास कार्यक्रम पत्रिकेचे वाटप करुन "शिका अग्नि सुरक्षितता, वाढवा उत्पादकता" या घोषवाक्यावर निबंध, पोस्टर्स, चित्रकला तसेच घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

अग्निशमन सेवा सप्ताहाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये मुख्यत्वे दि. १४ एप्रिल रोजी अग्निशमन विभाग येथे "अग्नि स्मृती दिन" पाळण्यात आला. त्यानिमित्ताने २×२१० मेगावॅट येथे मुख्य अभियंता मा.श्री. पी.के. खंडारे, मा.श्री. तासकर, मा.श्री. ए.एच. अष्टीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन अग्निशमन सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. तसेच शहीदांच्या स्मारकास पुष्पचक्र अर्पण करुन श्रध्दांजली वाहण्यात आली. याप्रसंगी उप मुख्य अभियंते सर्वश्री. एस.एस. सोनपेठकर, पी.जी. कुटेमाटे, विराज चौधरी, अधीक्षक अभियंते सर्वश्री. अशोक भगत, महेंद्र जिवने, एन.के. रोकडे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. झाडे तसेच कार्यकारी अभियंते, कल्याण अधिकारी आणि अग्निशमन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दि. १५ एप्रिल ते दि. २० एप्रिल दरम्यान उप मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. एस.एम. झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाने परिसरामध्ये विविध ठिकाणी तसेच शाळेमध्ये अग्निसुरक्षा जनजागृती वाढविण्यासाठी अग्निप्रतिबंधात्मक जनजागृती व्याख्यान, प्रात्यक्षिके व त्यावर आधारित प्रश्नमंजुषा यांसारखे विविध साप्ताहिक कार्यक्रमात औ.वि. केंद्रातील वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, कॉलनी परिसरातील महिला, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थीगण या सर्वांनी सहभाग नोंदविला.

अग्निशमन सेवा सप्ताहाचा समारोप व बक्षिस वितरणाचा कार्यक्रम मुख्य अभियंता मा.श्री. पी.के. खंडारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. सप्ताहादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील सहभागी विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमास वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, विभागप्रमुख, अग्निशमन विभागातील अधिकारी-कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांचे आयोजन उप अग्निशमन अधिकारी श्री. एस.एम. झाडे यांच्या विशेष मार्गदशनाखाली पार पडले. सूत्रबध्द आयोजन, संचलन व प्रास्ताविक कनिष्ठ अधिकारी श्री. ए.पी. भगत यांनी केले तर उपस्थितांसमोर वर्ष २०२१ मधील विविध आगींवर आणलेल्या नियंत्रणाबाबतचा आढावा उप अग्निशमन अधिकारी श्री. झाडे यांनी सादर केला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्य अभियंता मा.श्री. पी.के. खंडारे यांनी औष्णिक विद्युत केंद्रात आगीचे महत्व अनन्यसाधारण आहे. परंतु, आग आपल्या आटोक्यात असणे गरजेचे आहे याचे प्रतिपादन आपल्या भाषणातून केले तसेच अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे कर्तव्य व योगदान इत्यादिबाबत माहिती दिली. तसेच अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे संपूर्ण वर्षभरात वीजकेंद्रात आगीच्या दुर्घटना कमी झाल्यामुळे समाधान व्यक्त केले आणि आग लागूच नये यासाठी नेहमी सतर्क राहणे गरजेचे आहे, जेणेकरुन स्वत:चे, वीज केंद्राचे, समाजाचे व राष्ट्राचे हित जोपासण्याच्या कामी प्रत्येकांनी अग्रेसर राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या सरतेशेवटी कनिष्ठ अधिकारी श्री. डी.पी. कळंबे यांनी आभार व्यक्त केले व अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (कोळसा) मा.श्री. राजू बुरडे यांचा सेवानिवृत्तीपर कार्यक्रम मुख्यालयात संपन्न

दि. ३० जून २०२२ रोजी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (कोळसा) मा.श्री. राजू बुरडे यांचा सेवानिवृत्तीपर सपत्नीक सत्कार सोहळा कार्यक्रम मुख्यालय, मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे हे अध्यक्षस्थानी होते तर संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (मा.सं.) मा.डॉ. मानवेंद्र रामटेके, संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मुख्यालयातील अन्य मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक आणि वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी या सत्कार सोहळ्यास उपस्थित होते.

संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे व संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव यांनी कार्यकारी संचालक (कोळसा) मा.श्री. राजु बुरडे यांस शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला तर संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे यांनी प्रमाणपत्र देऊन गौरव केला. तर व्यवस्थापक (वित्त व लेखा) सौ. स्मिता चौधरी यांनी सौ. बुरडे यांचा सत्कार केला.

यावेळी कार्यकारी संचालक (कोळसा) मा.श्री. राजु बुरडे यांनी त्यांच्या कारकिर्दीत केलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. सर्व संचालकांनी आपल्या भाषणांत मा.श्री. बुरडे यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रशंसनीय व महत्वपूर्ण केलेल्या कामांचा अहवाल मांडून त्यांना सेवानिवृत्तीपर सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व सुसंवाद) मा.श्री. राजेश पाटील तसेच मुख्य महाव्यवस्थापक (मासं.) मा.श्री. आनंद कोंत यांनी सुध्दा आपापली मनोगते व्यक्त केली. तर उप मुख्य अभियंता श्री. अभिजीत कुलकर्णी यांनी आपल्या विनोदी शैलीतल्या भाषणातून उपस्थितांची मने जिंकली, तसेच विविध विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सुध्दा मा.श्री. बुरडे यांचेविषयी आपापले मनोगत मांडले.

सदर सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचलन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी तर आभार प्रदर्शन अतिरिक्त कार्यकारी अभियंता (कार्ये) श्री. नितीन जोगळेकर यांनी मानले.

# पता है ? मेरा बाप कौन है... ?

(१९ जून, फादर्स डे निमित्त)

– संतोष पुरोहित
सहाय्यक जनसंपर्क अधिकारी,
सांघिक नियोजन व सुसंवाद विभाग,
सांघिक कार्यालय, मुंबई.



एफ एम रेडिओ ऐकण्याचा एक चांगला फायदा म्हणजे ज्या त्या दिवसाचे महत्व सांगणारे कार्यक्रम चालू असतात. अशाच एका कार्यक्रमाचे नाव होते..."पता है ? मेरा बाप कौन है ?"

एक गाणे नंतर आपल्या वडिलांबद्दल भरभरून बोलणारे, पण कोणी सेलिब्रेटी नाही तर अगदी तुमच्या आमच्यातील. अगदी आसाम ते अरुणाचल येथील. छान वाटत होतं ऐकताना. अगदी ग्रामीण भागातून आलेली मुले-मुली आपापल्या वडिलांबद्दल अभिमानाने सांगत होते. हे सारे चालले होते "फादर्स डे" निमित्ताने.

गेल्या आठवड्यात ऑफिसमधील सहकारी मित्राशी बोलत होतो. मुलाला चांगल्या युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश मिळू शकतो, पैंशाचा प्रश्न नाही पण... मी पण काय विचारले तर उत्तर आलं, "मग माझं काय होईल ? माझा वेळ कसा जाणार ? आता ऑफिस नंतर माझं आयुष्य तोच आहे..." संवाद पुढे वाढत गेला पण यानिमित्ताने काही गोष्टी आठवल्या त्या या दिवसाच्या निमित्ताने.

पहिली मला आजोबानी सांगितलेली आणि खोलवर रुतून बसलेली. संत जनाबाई यांची. मोठ्या नवसाने तिचा जन्म झालेला. थोडी मोठी झाल्यावर तिला नवीन कपडे आणण्यात आले. काही दिवस तिला आवडीचे खाणे देण्यात आले नि एक दिवस तिचे वडील तिला घेऊन निघाले परत घरी कधीच न आणण्यासाठी. छोटी जनी वडिलांचा हात हातात घेऊन निघाली होती, दामाशेठ शिंपी यांच्याकडे कायमची राहण्यासाठी. तिने तिथे आनंदात आपल्याशिवाय राहावे म्हणून जाताना वाटेत वडील तिला आई बापांशिवाय वाढलेल्या चार भावंडांची गोष्ट सांगत होते, मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर यांचं नातं सोप्या भाषेत उलगडून देत होते. सुदामा आणि कृष्ण सांगत होते. गोष्टीत मन गुंतवत असताना डोळ्यांचा बांध रोखून नीट राहा पोरी सांगत होते. तो संत जनाबाईंचा पहिला प्रवास सांगताना वडिलांची अवस्था आजोबा मात्र भरल्या डोळ्यांनी सांगायचे. काही गोष्टी वाचलेल्या आठवल्या. मोहनदासचा महात्मा होण्याचा प्रवास, अब्दुलचा भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम होण्याचा प्रवास, श्यामचा साने गुरुजी होण्याचा प्रवास आणि या प्रवासातील वडिलांचं महत्व त्यांनी त्यांच्या भाषेत सांगितलेलं.

१) रामेश्वर सोडून जिल्ह्याच्या ठिकाणी रामनाथपुरमला शिक्षण घेण्यासाठी मी माझ्या वडिलांकडे परवानगी विचारली. विचारात पडल्यासारखे ते क्षणभर गप्प झाले. विचार करता करता त्यांना शब्द लाभावेत आणि ते ओठातून बाहेर पडावेत तसे वडील बोलू लागले.

"अब्दुल तुला मोठे व्हायचे असेल तर गाव सोडून शिक्षणासाठी बाहेर जायलाच हवे. सीगल पक्षी घरटे सोडून, एकटे दूरवर उडत जातात आणि नवे प्रदेश शोधतात. तसे या मातीचा आणि इथल्या स्मृतीचा मोह सोडून तुझ्या इच्छा आकांक्षा जिथे पूर्ण होतील तिथे तुला जायला हवे. आम्ही आमच्या प्रेमाने तुला बांधून ठेवणार नाही. आमच्या गरजा तुझा रस्ता अडवणार नाहीत." माझी आई माझ्याच काळजीने मला दूर पाठवायला आढेवेढे घेत होती. त्यांनी तिला खलील जिब्रानचे सुप्रसिद्ध शब्द ऐकवले.

"तुमची मुले ही तुमची नसतात. जीवनाला जगण्याची इच्छा होते, म्हणून मुले आणि मुली जन्माला येतात. ते तुमच्यामधून जन्म घेतात पण तुमच्यासाठी ,तुमच्याकडून जन्म घेत नाहीत. तुम्ही त्यांना प्रेम देऊ शकता पण तुमचे विचार देऊ शकत नाही. कारण प्रत्येक जीव आपली स्वतंत्र विचारधारा घेऊनच या जगात येतो." **(अग्निपंख).**

**२) राष्ट्रपिता ....**

दुसऱ्या चोरीच्या वेळी माझे वय १५ पंधरा वर्षांचे असावे. ही चोरी माझ्या मांसाहारी बंधूंच्या सोन्याच्या कड्याच्या तुकड्याची होय, त्यांना थोडेसे म्हणजे पंचवीस एक रुपयांचे कर्ज झाले होते. ते फेडावे कसे त्याचा आम्ही उभयंता बंधू विचार करत होतो. माझ्या बंधूंच्या हातात सोन्याचे भरीव कडे होते, त्यातून एक तोळा सोने कापून काढणे कठीण नव्हते.

कडे कापले, कर्ज फिटले परंतु मला ही गोष्ट असह्य झाली. यापुढे चोरी करायची नाही असा मी निश्चय केला. वडिलांपाशी कबुलीही देऊन टाकली पाहिजे असे वाटू लागले. पण जीभ तर चाले ना, वडील स्वत: मला मारतील अशी भीती वाटत नव्हती. त्यांनी उभ्या जन्मात आम्हा भावांना कधी तरी मारले असेल असे आठवत नाही. परंतु, त्यांना स्वत:ला दु:ख होईल, डोकेही आपटून घेतले तर ? हा धोका सहन करूनही गुन्हा कबूल केलाच पाहिजे. त्याखेरीज दोषाचे क्षालन होणार नाही असे मनाने घेतले.

अखेरीस मी ठराव केला की, चिठ्ठी लिहून गुन्हा कबूल करावा आणि माफी मागावी. मी चिठ्ठी लिहिली आणि स्वत: त्यांच्या हातात नेऊन दिली. चिठ्ठीमध्ये सर्व गुन्हा कबूल करून शिक्षा मागितली होती, त्यांनी स्वत:वर काही दु:ख ओढवून घेऊ नये अशी विनवणी केली होती व यापुढे अशा तऱ्हेचा गुन्हा न करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्यांनी चिठ्ठी वाचली. डोळ्यांतून मोत्याचे बिंदू गळाले. चिठ्ठी भिजली. त्यांनी क्षणभर डोळे मिटून घेतले. ती चिठ्ठी फाडून टाकली आणि वाचण्यासाठी बसले होते ते परत आडवे झाले.

मी पण रडलो. वडिलांचे दु:ख समजू शकलो. मी चित्रकार असतो तर

आजही ते चित्र पूर्णपणे रेखाटू शकलो असतो; इतक्या स्पष्ट रितीने ते माझ्या डोळ्यांसमोर उभे आहे. माझ्या दृष्टीने हा अहिंसेचा पदार्थपाठ होता. **(माझे सत्याचे प्रयोग).**

**३) श्यामची आई... रात्र सत्ताविसावी** याचे शीर्षकच आहे, "उदार पितृ हृदय" - घरी गाय व्यायली आणि श्यामला खरवस फार आवडतो म्हणून वडील सहा कोस भर उन्हातून चालत त्याच्या शाळेपर्यंत घेऊन येतात, दुपारची सुट्टी झालेली असते, श्याम व त्याचे मित्र झाडाखाली खेळत असतात एव्हढ्यात वडील शोधत येतात. त्यांचा तो गबाळा वेष पाहून श्यामला लाज वाटते व तो त्यांना कशाला आलात असे विचारतो या आपल्या कृत्याबद्दल गुरुजी लिहितात सहा कोस चालून आलेल्या पित्याचे प्रेम मला दिसले नाही. मी आंधळा झालो होतो. शिक्षणाने हृदयाचा विकास होण्याऐवजी संकोचच होत होता. शिक्षणाने अंतर्दृष्टी येण्याऐवजी अधिकच बहिर्दृष्टी मी होऊ लागलो होतो. जे शिक्षण मनुष्याला इतरांच्या हृदयात नेत नाही, इतरांच्या हृदय मंदिरातील सत्यदृष्टी दाखवत नाही ते शिक्षण नव्हे.

वडील सहा कोस चालून आले होते, एक खरवस वडी देण्यासाठी, किती प्रेम ? त्या प्रेमाला कष्टही आनंदरूप वाटत होते. ...मनुष्य हळूहळू वाढत जातो. आसक्तीमय जीवनाकडून निरासक्त जीवनाकडे वळतो. माझे आईबाप मला अपरंपार प्रेम पाजत होते, म्हणून थोडेतरी प्रेम मला आज देता येत आहे. याचा शेवट करताना गुरुजी लिहितात "सहा कोस खरवसाची वाटी घेऊन येणारे वडील आणि यांना पाठविणारी माझी आई थोर. या दोघांच्या प्रेमाचे ऋण कसे फेडणार? माझ्या शेकडो बहीण भावांना मी असेच निरपेक्ष प्रेम देईन तर त्यानेच थोडे ऋणमुक्त होता येईल."

हे सारे आपण वाचले पाहिजे, समजून घेत पुढे जायला पाहिजे. या दिवसाच्या निमित्ताने आणखी एक शेअर केल्याशिवाय मला थांबता येत नाहिये, ते म्हणजे एक चित्रपट. मुलगा आणि वडील यांच्या नात्यावरील इतका सुंदर चित्रपट दुसरा नसावा. तो म्हणजे "Bicycle Thieves" चित्रपटामध्ये मुख्य पात्रे दोन, एक लग्न झालेला आणि मुलगा असलेला नोकरीच्या शोधात असलेला गृहस्थ रिकी आणि याचा नऊ दहा वर्षांचा मुलगा ब्रुनो. महायुद्धाचे सावट, मंदीचा काळ अशावेळी नोकरी मिळते, पण अट असते सायकल पाहिजे. मग त्याची बायको घरातील वस्तूंच्या बदल्यात सायकल घेऊन देते. त्या दिवशी सगळे आनंदात दिवस घालवतात. दुसऱ्या दिवशी रिकी सायकल घेऊन नोकरीवर जातो, नोकरी असते भिंतीवर पोस्टर चिकटवण्याची. एके ठिकाणी रिकी पोस्टर चिकटवत असताना त्याची सायकल त्याच्या डोळ्यासमोरून चोरीला जाते. जीव तोडून रिकी पाठलाग करतो पण चोर आणि सायकल मिळत नाही. मिळालेली नोकरी जाते आणि इथून सुरु होते बाप आणि मुलाची सायकल शोधण्याची धडपड. चोर बाजारात सायकल शोधताना एक एक वस्तू तपासणारा ब्रुनो आपल्याला आतून हलवून टाकतो. पोलिसाला सायकलच्या फ्रेमचा नंबर सांगतो, त्या बाजारात आपली सायकल मिळणारच म्हणून धडपडणारा ब्रुनो, ती न मिळाल्यावर हिरमुसला झालेला ब्रुनो. एका क्षणी चोर दिसताच त्याचा पाठलाग करणारे बापलेक यांच्या सोबत आपण सायकलचा शोध घेवू लागतो. हे सारे प्रयत्न संपतात, तेव्हा रिकी ब्रूनोला बस पकडून घरी जायला सांगतो व रस्त्यात विमनस्क बसलेला असतो. त्याला समोर भिंतीला टेकून उभी केलेली एक सायकल दिसते, तो जवळ जातो आणि तिच्यावर बसणार एवढ्यात गलका होतो, रिकी चोरी करताना पकडला जातो, जमाव त्याला मारू लागतो पण बस न मिळाल्याने ब्रुनो परत येतो तेव्हा लोक रिकीला चोर म्हणून मारत असतात. ब्रुनो दया-वया करू लागतो, रडतो. जमावाला दया येते आणि ते रिकीला तंबी देऊन सोडून देतात. यानंतरचा शेवट... आपल्या मुलासमोर हे घडले म्हणून शरम आणि अध:पतन याने खचलेला बाप... पांगलेला जमाव. दोघे चालायला लागतात. आपल्याला हे सारे असह्य होत असताना तो लहानगा बापाच्या जवळ सरकतो आणि घट्ट हात हातात घेऊन चालायला लागतो... मित्रांनो जरूर बघा. you tube वर आहे.

बाकी माय ड्याडी स्ट्रॉन्गएस्ट, मेरे पापा को सब पता है, मेरे पापा कभी डरते नही, मेरे पापा मुझे सब कुछ देते है... आपला बाप, बापमाणूस आहे... हे सारे ऐकताना भारी वाटते. या मुलांना आतातरी या वाचलेल्या गोष्टी सांगूया...

******

प्रशासकीय वृत्त

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल रोजी विद्युत विहार कॉलनी कोराडी व आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी "विहार तेथे वाचनालय" या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक मंच, कॉलनी कोराडी येथे "क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले वाचनालयाचे" उद्घाटन करण्यात आले, ज्याचा फायदा कॉलनी कोराडी व आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी होईल.

दि. १५ एप्रिल २०२२ रोजी कोराडी कॉलनी येथे प्रबोधनात्मक व्याख्यानमाला व विविध स्पर्धेचे बक्षीस वाटप करण्यात आले. यानिमित्त कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महानिर्मिती कंपनीचे संचालक (मानव संसाधन) डॉ. मानवेंद्र रामटेके, कार्यक्रमाचे अध्यक्ष कोराडी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. प्रकाश खंडारे, स्वागताध्यक्ष कोराडी औ.वि. केंद्र - २१० मेगावॅट आणि कोराडी प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजकुमार तासकर, कोराडी प्रकल्पाचे मुख्य अभियंता प्रकल्प मा.श्री. अनिल आष्टीकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मा.श्री. पुरुषोत्तम वारजूरकर, प्रमुख वक्ते म्हणून मा.श्री. नरेंद्र जारोंडे व ॲड. श्री. अतुल पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती उत्सव समितीचे कार्याध्यक्ष हर्षद खंडारे यांनी केले, सूत्रसंचालन मनोरमा वाकडे व अनिरुद्ध खोब्रागडे तर आभार प्रदर्शन सोनाली वासनिक यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंकज हिरेकर, प्रशांत आठवले, अमर रामटेके, उमेश मेश्राम, दीपक अगमे, रतन बोरकर, नितीन गाडगे, राजेश हुमने, सुधीर वासनिक, विजय फुलझेले, देवेंद्र वाघमारे, प्रशांत काटकर, मिथुन कोडापे इत्यादी पदाधिकारी व सभासदांनी परिश्रम घेतले. सोबत रमाई महिला मंडळाचेही सहकार्य लाभले.

## उत्कृष्ट कोळसा व्यवस्थापन - संचलन कार्यप्रणालीच्या माध्यमातून महानिर्मितीची विक्रमी कामगिरी

आव्हानात्मक परिस्थितीत गेल्या सुमारे ३ महिन्यांपासून अतिशय सातत्याने उच्चतम विक्रमी कामगिरी नोंदविणाऱ्या महानिर्मितीने नुकतेच वीजनिर्मितीत आणखी काही नवे उच्चांक नोंदविले आहेत. मे २०२२ मध्ये महानिर्मितीने उच्चतम कामगिरीद्वारे ५१८२.४६३ दशलक्ष युनिट्स औष्णिक वीजनिर्मितीसह एकूण ५९८६.९१ दशलक्ष युनिट्स इतकी मासिक वीजनिर्मिती साध्य केली आहे. यापूर्वीची सर्वोच्च कामगिरी मार्च २०२१ मध्ये ५००३ दशलक्ष युनिट्स मासिक औष्णिक वीजनिर्मिती व एप्रिल २०२२ मध्ये एकूण ५९४८ दशलक्ष युनिट्स इतकी मासिक वीजनिर्मिती अशी होती.

तसेच महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राने टप्पा क्र. ३ (३× ६६० मेगावॅट) संचांमधून मे २०२२ मध्ये ११९२.३४३ दशलक्ष युनिट्स इतकी मासिक वीजनिर्मिती साध्य करीत आजवरची विक्रमी कामगिरी केली आहे. वीजनिर्मितीमध्ये सातत्य राखत असताना कोराडी औष्णिक विद्युत केंद्राने ८०.९४% भारांक नोंदविला आहे. यापूर्वीची कोराडी विद्युत केंद्राची महत्तम कामगिरी मार्च २०२२ मध्ये ११५८.८१३ दशलक्ष युनिट्स इतकी मासिक वीजनिर्मिती व ७८.६६% भारांक अशी होती.

देशभरातील कोळसा टंचाईच्या परिस्थितीतही उच्चतम कार्यक्षमता राखत महानिर्मितीने लक्षणीय वीजनिर्मिती साध्य केलेली आहे. देखभाल-दुरुस्तीच्या काटेकोर व्यवस्थापनाचे पालन करून औष्णिक संचांची उपलब्धता १००% असावी, यासाठी महानिर्मिती सतत प्रयत्नशील आहे. महानिर्मितीचे बहुतांशी औष्णिक संच वीजनिर्मितीसाठी उपलब्ध असल्याने त्या प्रमाणात या संचांना पुरेसा कोळसा उपलब्ध करून देणे हे आव्हान महानिर्मितीच्या इंधन व्यवस्थापन कक्षाने देखील समर्थपणे पेलले असून मे महिन्यात त्यासंदर्भात काही विक्रम देखील साध्य केले आहेत. महानिर्मितीच्या इंधन व्यवस्थापन कक्षाच्या माध्यमातून मे महिन्यामध्ये विक्रमी ४१,७३,८८३ मेट्रिक टन इतका मासिक कोळसा उपलब्ध करण्यात यश मिळविले असून या काळात एकूण ९३६ कोळसा रेक्सद्वारे प्रतिदिन सरासरी सुमारे ३०.१९ रेक्स कोळसा उपलब्ध झाला आहे. महानिर्मितीच्या आजवरच्या इतिहासात महिनानिहाय प्राप्त एकूण कोळसा रेक्स, त्यायोगे प्राप्त प्रतिदिन सरासरी कोळसा रेक्सचे प्रमाण व एकूणच कोळशाची मासिक उपलब्धता या तीनही बाबींमध्ये आजवरची ही सर्वोच्च कामगिरी आहे.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रासहित एकूणच महानिर्मितीच्या या विक्रमी वीजनिर्मितीबाबत तसेच उत्कृष्ट कोळसा व्यवस्थापनाबाबत मा. ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, संचालक (संचलन) श्री. चंद्रकांत थोटवे तसेच संचालक (माईनिंग) श्री. पुरुषोत्तम जाधव व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## महानिर्मितीच्या कोयना जल विद्युत केंद्राची उत्कृष्ट कामगिरी

महाराष्ट्र राज्यासाठी भूषण असलेले कोयना जल विद्युत केंद्र हे १६ मे १९६२ पासून अविरतपणे स्वच्छ, नितळ व प्रदूषणविरहित ऊर्जानिर्मिती करत आहे. स्थापित क्षमतेमध्ये भारतातील दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या या जल विद्युत केंद्राने यावर्षी हिरक महोत्सवी वर्षात पदार्पण करताना २,००,००० दशलक्ष युनिट्स इतकी ऊर्जानिर्मिती करून एक मैलाचा दगड पार केला आहे.

जुलै २०२१ ला झालेला प्रचंड पाऊस, चिपळूणमध्ये उद्भवलेली पूरस्थिती, टप्पा-४ च्या अवजल विसर्गाच्या मुखाशी पावसाच्या प्रवाहाने जमा झालेला गाळ, त्यामुळे नाईलाजाने बंद ठेवावे लागलेले टप्पा-४ चे संच तसेच वसाहतीमध्ये व वीज केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक ठिकाणी झालेले भूस्खलन अशा सर्व आव्हानांना धीरोदात्तपणे सामोरे जाऊन कोयना जल विद्युत केंद्राने २०२१-२२ या जल वर्षांमध्ये मागील ८ वर्षांपेक्षाही जास्त, ३,८६८ दशलक्ष युनिट्स इतकी वीजनिर्मिती करून राज्याची विजेची मागणी पूर्ण करण्यास मोलाची मदत केली आहे. विशेषत: सप्टेंबर व ऑक्टोबर २०२१ मध्ये पूर्ण देशामध्ये कोळशाची टंचाई असताना कोयना जल विद्युत केंद्राने ७८१ दशलक्ष युनिट्स इतकी वीज निर्मिती या दोन महिन्यात केली. मार्च, एप्रिल व मे मधील विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन, कोयना जल विद्युत केंद्राने या तीन महिन्यात मिळून १,७९२ दशलक्ष युनिट्स इतकी वीजनिर्मिती साध्य केली. कोयना जल विद्युत प्रकल्पातून मिळणारी वीज ही तुलनेने स्वस्त असून वीज ग्राहकांवरील अतिरिक्त भार कमी करणेस मदत होते.

आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये CEA ने निर्धारित केलेल्या वीजनिर्मिती लक्ष्यापेक्षा (३,३८४ दशलक्ष युनिट्स) जास्त ३,६४३ दशलक्ष युनिट्स तर जलवर्ष २०२१-२२ मध्ये ३८६८ दशलक्ष युनिट्स इतकी वीजनिर्मिती करताना, संचाच्या कार्यक्षमता वाढीसाठी ठरवलेली सर्व कॅपिटल ओव्हर हॉलची कामे वेळेत पूर्ण करून संच उपलब्धता देखील ९५% ते १००% इतकी राखण्यात सातत्य ठेवले. कोयना जल विद्युत केंद्राने या काळात आजवरची विक्रमी कामगिरी नोंदवून राज्यातील वीजग्राहकांना प्रामुख्याने शिखर मागणीच्या काळात मोठा दिलासा दिलेला आहे.

भविष्यातदेखील आपली कार्यतत्परता, कर्तव्यनिष्ठा व सांघिक प्रयत्नांच्या जोरावर कोयना जल विद्युत केंद्र यापुढेही अनेक यशोशिखरे पादाक्रांत करून महानिर्मितीला अत्युच्च शिखरावर नेण्यासाठी कायम प्रयत्नशील राहील असा विश्वास, मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांनी व्यक्त केला.

महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक (संचलन) श्री. चंद्रकांत थोटवे यांच्या नेतृत्वामध्ये कोयना जल विद्यत केंद्रही उत्कृष्ट कामगिरी करू शकले. कोयना जल विद्युत केंद्राच्या या विक्रमी कामगिरीबद्दल ऊर्जामंत्री मा.डॉ. नितीन राऊत यांनी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे व संचालक (संचलन) श्री. चंद्रकांत थोटवे तसेच अभियंत-तंत्रज्ञ-अधिकारी व कर्मचारी आणि कंत्राटी कामगार यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सार्वजनिक जयंती उत्साहात संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्रात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९५वी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१वी सार्वजनिक जयंती उत्सव शासनाच्या कोरोना (कोविड-१९) नियम / निर्देशांचे पालन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त दि. ०६ एप्रिल २०२२ ते १३ एप्रिल २०२२ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक डे नाईट क्रिकेट लीग सामने, व्हॉलीबॉल स्पर्धा, सायकल रॅली, रक्तदान व तपासणी शिबीर, मुलींसाठी व महिलांसाठी विविध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, ग्रुप डान्स, प्रश्नमंजुषा, 'मी सावित्री बोलतेय' हा एकपात्री नाट्यप्रयोग, चित्रकला, टैलेंट शो, रांगोळी स्पर्धा, आनंद नगरी व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक ११ एप्रिल रोजी सायंकाळी महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त प्रसिद्ध वक्ते श्री. अमर हजारे, बीड यांनी 'महात्मा फुलेंची सामाजिक क्रांती' या विषयावर आपले विचार मांडले

दि. १३ एप्रिल रोजी प्रा. अविनाश नाईक, नांदेड यांनी बुद्ध-फुले आंबेडकरी गीतांचा प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी २१० मेगावॅट जुने औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वार येथे सुरक्षा विभागातील मेस्को कर्मचाऱ्यांच्या वतीने जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित मुख्य अभियंता मा.श्री एम.पी. आव्हाड यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

तद्नंतर प्रशासकीय कार्यालयाच्या सभागृहात शासकीय जयंतीचे आयोजन सर्व अधिकारी, कर्मचारी, अभियंता याच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. श्री. सुधीर मुंडे, श्री. सोपान चौधरी, सौ. माधुरी जवजाळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी विचार व कार्य उपस्थितांसमोर मांडले. अध्यक्षीय भाषणात मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असून आधुनिक भारताचेही निर्माते असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार, श्री. एस.पी. राठोड, अधीक्षक अभियंता श्री. डी.जी. इंगळे, श्री. सी.आर. होळंबे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. एन. के. चन्ने, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी, सर्व विभागप्रमुख तसेच संघटना प्रतिनिधी व अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीनिमित्त दि १४ एप्रिल २०२२ रोजी सकाळी युवा अभ्यासक व प्रसिद्ध के श्री. राहुल गिरी, औरंगाबाद याचे 'भिमराया तुम्ही होते म्हणून' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी विचारमंचावर मुख्य अभियंता मा.श्री. एम.पी. आव्हाड, प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार, श्री. एस.पी. राठोड, अधीक्षक अभियंता श्री. डी.जी. इंगळे, श्री. सी.आर. होळंबे, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे कार्याध्यक्ष श्री. अरुण चाटे, उपाध्यक्ष श्री. महेंद्र रोडे, सचिव श्री. जयवर्धन सुर्यवंशी, कोषाध्यक्ष श्री. प्रणव हत्ती अंबीरे, अप्पासाहेब वडमारे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. वरील सर्व कार्यक्रमास वीज केंद्रातील अधिकारी, कर्मचारी अभियंते व सर्व संघटना प्रतिनिधी तसेच कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे सहभागी झाले होते. सर्व क्रीडा स्पर्धा, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. महेंद्र शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन राहुल बनसोडे व सुनील काळे यांनी मांडले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक ११ एप्रिल २०२२ व १४ एप्रिल २०२२ रोजी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम साजरा करण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक जयंती उत्सव समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीद्वारे विविध कार्यक्रमाचे व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रित्यर्थ भीमज्योती क्रिकेट सामने, बॅडमिंटन सामने, कॅरम, व्हॉलीबाल सामने, कबड्डी सामने, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, लिंबू चमचा, मटका फोड स्पर्धा, स्नेहभोजनाचे व तसेच आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

दिनांक ११ एप्रिल ते १४ एप्रिल २०२२ संपूर्ण कार्यक्रमात व विविध स्पर्धेत विद्युतनगर वसाहतीमधीत रहिवाश्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रम समितीमध्ये अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे, उपाध्यक्ष म्हणून श्री. आर.बी. गिरी उपमुख्य अभियंता, मुख्य सल्लागार म्हणून श्री. धनंजय पंधाडे, श्री. संजय कांबळे अधीक्षक अभियंता व श्री. राजेश गट्टूवार प्रभारी अधीक्षक अभियंता, कार्याध्यक्ष श्री. हिम्मतराव इंगळे, सचिव श्री. चंद्रविजय जामनिक, सहसचिव श्री. दीपक सावदेकर, श्री. प्रशांत गजभिये, कोषाध्यक्ष श्री. दिलीप पातोडे, सहकोषाध्यक्ष श्री. श्रीकृष्ण अरखराव व श्री. संघपाल झंडारे लेखापरीक्षक म्हणून श्री. डी.एस. सोनवणे व इतर अधिकारी / कर्मचारीवृंद कार्यक्रमात सहभागी होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन श्री. श्रीकृष्ण अरखराव यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रात दिनांक ३० एप्रिल २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचा सुरुवातीस मुख्य अभियंता मा.श्री. खटारे यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले व तद्नंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंता श्री. धाडे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार आणि अन्य अधिकारी-कर्मचारी वृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्रात दि. ३ मे २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एम.पी. आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा बसवेश्वर यांची ८९१वी जयंती सकाळी शासकीय कार्यालयातील सभागृहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम मुख्य अभियता श्री. आव्हाड यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करूण महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यातून महात्मा बसवेश्वर यांचे विचार आचरणात आणण्यासाठी प्रयत्न करावे, असे मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रभारी उप मुख्य अभियंता प्रभारी श्री एस.पी. राठोड, अधीक्षक अभियंता श्री डी.जी. इंगळे आणि कार्यालयातील वरिष्ठ अभियंते-तंत्रज्ञ, अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी तसेच संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. राजेभाऊ गजले यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. एम.एस. शिंदे यांनी मांडले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्रात दि. ३० एप्रिल २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एच.के. अवचार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ११३वी जयंती सकाळी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम मुख्य अभियंता मा.श्री. अवचार यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार आचरणात आणण्यासाठी प्रयत्न करावे, असे मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रभारी कल्याण अधिकारी श्री. व्ही.जी. ताटे, तसेच अन्य अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी व संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. के.एच. गिते यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. एम.एस. शिंदे यांनी मानले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रात दिनांक ०३ मे २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मुख्य अभियंता मा.श्री. खटारे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले व तद्नंतर महात्मा बसवेश्वरांच्या जीवनकार्याची माहिती विषद करण्यात आली.

या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार आणि अन्य अधिकारी-कर्मचारी वृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात संत गाडगेबाबा महाराज व संत रविदास महाराज जयंती उत्साहात संपन्न

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे बुधवार, दि. २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी सौदामिनी प्रशासकीय इमारत येथे संत गाडगेबाबा महाराज व संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.


यावेळी सर्वप्रथम खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे यांचे शुभहस्ते संत गाडगेबाबा महाराज व संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमास अधीक्षक अभियंते सर्वश्री. अनिल काठोये, श्री. प्रविण रोकडे आणि अन्य वरिष्ठ अभियंते-तंत्रज्ञ, अधिकारी-कर्मचारी, महिला कर्मचारी व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रभारी कल्याण अधिकारी (कामगार औद्योगिक संबंध विभाग) श्री. अमरजीत गोडबोले यांनी केले.

Something Very Interesting

# UTILISATION OF SUGARCANE DRY PRESSMUD AS A FUEL AT THERMAL POWER PLANTS (Part - II)

**- Sanjay Sadashiv Kurhade**
Superintending Engineer &
OSD to CMD,
H.O., Mumbai




**(Continue from Part - I)**

## 4. BLENDING OF DRY PRESS MUD WITH INDIAN COAL :

Thermal Power Stations are consuming more than 75% of total coal produced in India. Coal is the most reliable and abundant fuel for power generation. The quality of coal is deteriorating gradually affecting its efficient utilization and performance of power stations.

Average ash content of the coal fired to the generating units is in the range of 35-45% with a calorific value of 2800-3800 K Cal/kg, which is much inferior in quality to that of designed coal. Increased dependence of power sector on the inferior quality of coal (high ash laden coal) not only poses environmental problems but also causes poor plant performance and high cost for O & M and also ash disposal.

In addition to above, transportation of sufficient coal at load centre thermal power stations is also a major constraint in India causing increase in cost of coal due to transportation, which is affecting the generation cost.

Hence, it is advisable to blend the dry press mud with low quality Indian coal to improve GCV and reduce ash content of mixture. Dry press mud blending up to 20% may thus help to improve quality of fired fuel in some extent and high ash content effects if any during combustion will be minimised. Blending with different qualities of coal may also change % blending with the dry press mud and will help to supply blended fuel having low cost and also it will be commercially beneficial to farmers.

However, press mud blending with coal is not directly fired at thermal power stations in India, which calls for study scientifically the compatibility of the press mud with respect to its burning behaviour in a thermal power station boilers and other issues involved in coal blending with press mud for efficient green power generation.

## 5. STUDIES REQUIRED FOR BLENDING OF DRY:

The detailed study is required to carry out for utilization of dry press mud blending with Indian coal for TPS which is centered on following aspects:

1. Characterization of coal and press mud to be determined for proper combustion in boiler. Proximate analysis (Moisture, Ash, VM & FC) & GCV were determined to access the blending ability of coal & press mud. Additive proximate analysis values and GCV is an indication of proper mixing. Hardgrove Grindibilty Index (HGI) was determined for all individual coals. This data will give an indication on how coal & press mud blends shall behave in mills.
2. *Slagging/Clinkering behavior of ash*: Ash fusion temperature and chemical composition of ash analysis should carried out for assessing slagging/clinkering propensity of coal & press mud mixture during combustion in furnace. Ash fusion temperatures along with chemical composition of ash give a fairly good indication about slagging nature of blending. This study is very much important since slagging characteristics i.e. ash fusion temperatures are not additive in nature. Blending may affect ash fusion characteristics badly and lead to slagging.
3. *Combustion behavior of coal & press mud blending*: Laboratory scale combustion behavior study of coal & press mud blend should be carry using Differential Scanning Calorimetric burning profile analysis of coal & press mud. Burning profiles analysis will give a fairly good comparative indication of how a blending is expected to burn in a furnace with respect to a proven coal. Analysis of three different data temperatures of burning profile should carry.
4. Swelling characteristic of blending also affects combustion of pulverized coal. Sometimes coal or

press mud swells and particles agglomerate during devolatilization stage. Swelling and agglomeration of particles leads to delayed combustion and results in unburned carbon loss. Hence swelling index test require carrying out to access swelling nature of coal & press mud.

Apart from that Bench scale, Drop Tube Furnace (DTF) test also include in the study for Indian coal & press mud blending to validate findings of Differential Scanning Calorimetry (DSC) studies. DTF test and swelling index analysis facility required to be carry out from CFRI, Dhanbad.

**Activities Involved:-**

**Phase - I : Mahagenco team activities:**

i. Formation of Mahagenco study team with members from Expert Support Team (EST), Fuel Management Cell (FMC), Works section from HO Mumbai and Boiler expert from TPS Parli.

ii. Discussions with Vasantdada Sugar Institute (VSI), Pune a premier Research & Development Organization in Sugar & allied Industry regarding chemical & physical properties, environment impact & disposal of Press mud.

iii. Selection of sugar factories for press mud sample, who will supply sufficient quantity of press mud.

iv. Collection of coal samples from Parli TPS and press mud samples from minimum three selected locations.

v. Preparation four blends of coal & press mud of 5%, 10%, & 20%.

vi. Characterization of Coal and press mud e.g. proximate analysis, calorific value, ash fusion temperature etc.

vii. Ash composition analysis by Atomic Absorption Spectrometry (AAS) of Coal and press mud.

viii. Combustion profile of coal & press mud by differential Scanning Calorimeter (DSC).

ix. Blend data analysis from the point of view of Combustion behavior, Slagging /clinkering tendency and impact on emission.

*x. If required study of utilization of Catalyst/additives to improve combustion performance. Find out effects of addition of the catalysts/additives with coal & press mud blending and effect on performance & environment protection.*

**Phase - II : Activities will be carried out at CFRI:**

i. Swelling Index of individual coals and their blends.

ii. Drop tube furnace test and few other tests like Carbon & Hydrogen analysis, petrographic analysis and Thermogravimetric analysis (TGA)-Derivative Thermogravimetric (DTG) analysis essential and prerequisite to DTF analysis to ascertain overall combustion efficiency of different Coal blends.

**Phase - III : Discussions/Consultation with Expert:**

i. Technical discussion with CPRI and NTPC R&D for their help for analysis of various effects during trial test at Parli TPS.

ii. Consultation with M/s BHEL R&D and Boiler Design department for experimental & computational study and methodology with respect to post impact & issues due to firing of dry press mud in boiler.

iii. Visit to National Center for Combustion Research and Development (NCCRD), IIT Madras or IIS, Bangalore to characterize the physicochemical, structural, thermo-physical, surface and electro-physical properties of press mud & coal blending.

iv. Discussions on Operation & Maintenance Constraints.

v. Discussions on environmental impacts.

**Phase - IV : Activities will be carried out at Parli TPS:**

i. Preparation for trial test at Parli TPS.

ii. Deciding methodology & mechanism of blending.

iii. Trial tests at Parli TPS in presence of M/s BHEL R&D, Design department.

iv. Monitoring of Performance

**6. SAMPLING & TESTING OF COAL AND PRESS MUD :**

***Characterization of individual Coal and their blends :***

a) **Proximate analysis**: Proximate analysis of coal, press mud and their blends should be done as per IS: 1350 (Part I). Gross Calorific Value (GCV) was carried out based on standard method raid down in IS: 1350 (Part II).

b) **Hard-Grove Grind ability Index (HGI)**: HGI of press mud and Indian Coal from Parli TPS to carry out in accordance with IS: 4433.

c) **Ash Fusion Temperatures (As per ASTM: D1854)**: Coal & press mud convert into ash by heating in furnace at 815° C for 2 hrs. Coal & press mud ash is used for determination of ash fusion temperature by Heating.

d) **Ash composition analysis (by AAS):** Chemical composition (mineral constituents) of Ash) -

Oxides of Iron, Aluminum, Silicon, Calcium, Magnesium, Sodium and Potassium are determined by digesting the ash in mixture of acids followed by detection of metals by AAS.

e) **Swelling Index of coal**: This test is conducted to understand the combustion behavior of coal, press mud and their blends. Coal with high swelling index may lead to incomplete combustion and high un-burnt carbon in bottom ash and fly ash.

**Table - I**

**Test Report of Four Samples of Press Mud, (Parli TPS Lab.)**

MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD. NPTPS, PARLI-V.
Actual Report

DATE:- 26.02.2019

As per Coal analysis

| | Air Dry Basis | | | | | As Fired Basis | | | | | GCV by bomb calorimeter Kcal/Kg |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M % | Ash % | VM % | FC % | GCV Kcal/Kg | TM % | Ash % | VM % | FC % | GCV Kcal/Kg | |
| A1 | 3.16 | 16.38 | 57.64 | 22.82 | 4090 | 10.16 | 15.20 | 53.47 | 21.17 | 3794 | 3971 |
| | 3.47 | 16.70 | 57.33 | 22.50 | 4058 | 10.19 | 15.54 | 53.34 | 20.93 | 3775 | |
| A2 | 3.81 | 25.54 | 47.75 | 22.90 | 3599 | 10.16 | 23.85 | 44.60 | 21.39 | 3361 | 3447 |
| | 3.84 | 26.49 | 46.72 | 22.95 | 3550 | 10.19 | 24.74 | 43.63 | 21.43 | 3315 | |
| A3 | 3.00 | 26.39 | 44.57 | 26.04 | 3601 | 10.16 | 24.44 | 41.28 | 24.12 | 3335 | 3562 |
| | 3.30 | 25.21 | 44.27 | 27.22 | 3646 | 10.19 | 23.41 | 41.12 | 25.28 | 3386 | |
| A4 | 3.76 | 22.18 | 48.36 | 25.70 | 3773 | 10.16 | 20.71 | 45.14 | 23.99 | 3522 | 3702 |
| | 3.73 | 22.22 | 48.39 | 25.66 | 3772 | 10.19 | 20.73 | 45.14 | 23.94 | 3519 | |

**Table - II**

**Test Report of Press Mud Blending with Indian Coal (Parli TPS Lab.)**

nitrogen (1.63–2.29), ash (19.28–30.76), sugar (12.10–13.29) and crude wax (6.70–11.01).

Acid value (26.95–27.68), saponification value (102.59–103.01) and iodine value (6.72–6.82) were also studied of the extracted wax nitrogen (1.63–2.29), ash (19.28–30.76), sugar (12.10–13.29) and crude wax (6.70–11.01).

Acid value (26.95–27.68), saponification value (102.59–103.01) and iodine value (6.72–6.82) were also studied of the extracted wax nitrogen (1.63–2.29), ash (19.28–30.76), sugar (12.10–13.29) and crude wax (6.70–11.01). Acid value (26.95–27.68), saponification value (102.59–103.01) and iodine value (6.72–6.82) were also studied of the extracted wax nitrogen (1.63–2.29), ash (19.28–30.76), sugar (12.10–13.29) and crude wax (6.70–11.01).

MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD. NPTPS, PARLI-V.
Bagases Actual Report

DATE:- 23.03.2019

| | Air Dry Basis | | | | | As Fired Basis | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M % | Ash % | VM % | FC % | GCV Kcal/Kg | TM % | Ash % | VM % | FC % | GCV Kcal/Kg | Bomb |
| Bagass(A4) 5% + COAL | 1.14 | 46.60 | 27.09 | 25.17 | 4004 | 9.05 | 42.87 | 24.92 | 23.16 | 3684 | 3823 |
| | 1.38 | 46.56 | 26.96 | 25.09 | 3973 | 9.05 | 42.94 | 24.86 | 23.14 | 3664 | |
| Bagass(A4) 10% + COAL | 1.24 | 45.78 | 27.19 | 25.78 | 4067 | 9.59 | 41.91 | 24.89 | 23.60 | 3723 | 3870 |
| | 1.33 | 45.33 | 28.43 | 24.91 | 4096 | 9.59 | 41.54 | 26.05 | 22.82 | 3753 | |
| COAL GCV (3933) | 1.46 | 46.86 | 27.67 | 24.01 | 3933 | 9.05 | 43.25 | 25.54 | 22.16 | 3630 | |

28/3/19
Executive Chemist,
WTP,NPTPS PARLI-V.

**Table –III**

**Test Report of Press Mud Blending with Indian coal (CSIR-CIMFR Lab.)**

| | | |
|---|---|---|
| Test Report No: TC564619000011999F | | Date: 04.12.2019 |
| Discipline: Chemical Testing | | Group: Solid Fuels |
| Name & Address of The Party: | Parli Thermal Power Station, ParliVaijnath, Beed (MAHAGENCO) | |
| Party Advice No & Date: | CE/GEN/PRL/WTP-III/1658/No-896 Dt. 22.06.2019 | |
| Work Order No | P. O. No. PLTPS/4500092136/No. 05985 Dt. 03.08.2018 | |
| Test Method Used for Analysis: | IS 1350 Part 1 for Proximate Analysis, IS 1350 Part 2 for GCV | |
| Condition of the sample received | Unsealed | |
| Samples Received on: | 24.06.2019 | |
| Test Performed On: | Proximate Analysis – 03.07.2019 & GCV-03.07.2019 | |
| Sampling Method: | Sampling not done by CSIR-CIMFR | |
| Size Tested: | 212 micron (BS 72 mesh) | |
| Total No of Page(s): | 1 | |

TEST RESULTS

| Sr. No. | Party Sample ID No. | Weight of Sample Received (in grams) | On Air Dried Basis | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Proximate Analysis | | | | GCV Kcal/Kg |
| | | | Moist % by mass | Ash % by mass | V.M. % by mass | F.C. % by mass | |
| 1 | Coal Sample-1 ID- Coal-1/June - 2019 | 85 | 3.8 | 45.7 | 21.3 | 29.2 | 3387 |
| 2 | Coal +5%, Blended - 1 ID- 5% Blend Coal-1/June - 2019 | 50 | 4.4 | 44.9 | 22.6 | 28.1 | 3406 |
| 3 | Coal +10%, Blended - 1 ID- 10% Blend Coal-1/June - 2019 | 50 | 4.2 | 44.0 | 25.0 | 26.8 | 3428 |

MOIST-MOISTURE, V.M.-VOLATILE MATTER, F.C.-FIXED CARBON, GCV- GROSS CALORIFIC VALUE

## 7. FINANCIAL ANALYSIS:

### i. New Parli TPS (3x250 MW) Coal requirement:

| Sr. No | Particulars | Coal Quantity |
|---|---|---|
| 1 | Coal Consumption T/Hr for 250 MW Unit in | 183 |
| 2 | Specific Coal in Kg/Kwh | 0.664 |
| 3 | Coal Requirement in T/Day for 250 MW Unit | 4392 |
| 4 | Coal Requirement for 250 MW Unit in Lakhs Tones per Month | 1.318 |
| 5 | Coal Requirement in MMTPA for 250 MW Unit | 1.204 |
| 6 | Coal Requirement in MTPA for 3x250 New Parli TPS | 3.612 |
| 7 | Coal Requirement in Million Tons for 3x250 New Parli TPS during summer period (Dec. to May - 6 Months) | 1.806 |
| 8 | **10 % of Coal Requirement in Tons for 3x250 New Parli TPS during summer period (Dec. to May - 6 Months).** | **180 600** |
| 9 | **10 % of Coal Requirement Tons per day for 3x250 New Parli TPS** | **6020** |

**ii. Press Mud Availability in Western Maharashtra:**

There are more than 140 Nos sugar factories in Western Maharashtra & Marathawada and the production of sugar starts every year from October or November every year. These factories crushing more than 70 Million Metric Tonnes of sugarcane and the production of Press Mud is more than 2.0 MMT per year as a waste. Hence about 1.0 MMTPA dry press mud will be easily available for 5-10 % blending with Indian Coal at New Parli TPS.

**iii. Effect on Generation Cost :**

In addition to above there are various benefits of utilisation of dry press mud blending with coal such as improvements in boiler performance due to improvement in blended coal GCV, minimisation of environment pollution as Renewable Energy, Financial benefits to farmers etc.

| Sr. No | Description | Figures |
|---|---|---|
| **A.** | **Coal Cost:** | |
| 1 | Coal Received at New Parli TPS Average GCV in Kcal/Kg | 3200 to 3500 |
| 2 | Average cost in Rs per Ton at New Parli TPS with Transport | 4250 |
| 3 | Cost in Rs per KCal | 1.27 |
| 4 | 10 % of Coal Requirement in **Tons** for 3x250 New Parli TPS during summer period (Dec. to May - 6 Months). | 180600 |
| 5 | Cost in **Rs Crs**. of 10 % of Coal Required in Tons for 3x250 New Parli TPS during summer period (Dec. to May - 6 Months). | 76.750 |
| **B.** | **Press Mud Cost:** | |
| 1 | Press Mud Average GCV in Kcal/Kg | 3500 to 3900 |
| 2 | Average cost in **Rs per Ton** at New Parli TPS with Transport | 2250 |
| 3 | Cost in Rs per KCal | 0.61 |
| 4 | Requirement of dry Press Mud in **Tons** during summer period (Dec. to May- 6 Months) for blending with coal . | 185000 |
| 5 | Cost of 1.85 Lakh Tons press mud in **Rs Crs**. for 3x250 New Parli TPS during summer period (Dec. to May - 6 Months). | 41.630 |
| **C.** | **Savings if 10 % Press Mud blended with Indian Coal during 6 Months Summer period (A -B) in Rs Crs,** | **35.12** |

**iv. Benefits to Sugar Industry in point of view environment: The sugar factories has the major challenge to dispose of the generated press mud during sugar manufacturing process. Presently press mud mainly used as soil fertilizer, which** increases the wax content in the soil. The increase in wax reduces the porosity of the soil causing reduced penetration and permeability. Utilisation press mud for blending with Indian coal in power generation will be beneficial to environment and generate extra revenue to the sugar factories.

## 8. CONCLUSION :

- **Promotional policy for the blending of agro waste with Indian Coal viz. press mud and utilisation for Thermal Power Plants.**
- **It is essential to carry out details study of press mud, its blending with coal and R&D in TPS boilers for burning of multi fuels blending to improve performance & protect environment.**
- **Dry press mud blending with Indian coal in thermal power plants for power generation is an efficient way of utilizing the agro waste to improve performance and minimising environmental pollution.**
- **Dry press mud utilisation for power generation will be beneficial to farmers and will help to improve farmers' economy.**


**COURTESY - REFERENCES**

1. **Final Report of the MNRE Project Advanced Biomass Research Centre (ABRC) Submitted in October 2014 by Combustion, Gasification & Propulsion Lab (CGPL), Department of Aerospace Engineering, IIS, Bangalore 560 012 (http://cgpl.iisc.ernet.in)**
2. **A Thesis on Assessment of the Potential utilization of Sugarcane derived press mud for electricity generation in south Nyanza sugar zones, Kenya** by **Evans Ochieng Nyonje submitted for Master of Science (Energy Technology).**
3. **A Report on "Physico-Chemical Characterization of Sulphidation Press mud, Composted press mud and Vermi-composted Press mud"** by Namita Joshi & Sonal Sharma, Department of Environmental Sciences, Kanya Gurukul Mahavidyalaya.
4. **Article on "Chemical Studies on Press Mud: A Sugar Industries Waste in Bangladesh" published in Sugar Tech June 2012A https://www.researchgate.net/publication/257780618,**
5. **A report on "Characterization of sugar industry wastes for solid state Bioconversion" by Md. Niamul Bari1 & Tasrif Ahmed,** *Department of Civil Engineering, Rajshahi University of Engineering & Technology, Rajshahi, Bangladesh*
6. A report on "**Biogas From Press mud" by** Karan M. Agrawal, B. R. Barve & Shareena S. Khan published in *IOSR Journal of Mechanical and Civil Engineering (IOSR-JMCE)* www.iosrjournals.org
7. Study Report on "**Comprehensive Study On Characterization of Sugar Pressmud Along with Suitable Microbial Consortium for Press mud Composting" by Shivajeet Ambigar & Amar Byakodi published in International Research Journal of Engineering and Technology (IRJET) Volume: 05 Issue: 06 | June 2018 www.irjet.net**
8. A Ph.D Research Scholar **Report on "Studies on sugarcane press mud and distillery Waste as a bio-fertilizer through composting" by K. Rasappan, A. Kumar & P. Santhosh,** Coimbatore Institute of Technology, Coimbatore – 461021 (T.N.) India.
9. **Various** reports on website of "Vasantdada Sugar Institute", Pune, https://www.vsisugar.com
10. **Reports on website of** "Central Institute of Mining and Fuel Research", Dhanbad, Jharkhand 826015, http://cimfr.nic.in.
11. M/s BHEL, R&D and Boiler Design department, website: www.bhel.com
12. Various reports on Central Electricity Authority, website: www.cea.nic.in
13. Indian Power Sector website reports, http://www.indianpowersector.com/
14. Various reports on New & Renewable Energy, website: www.mnre.gov.in
15. Study reports of Maharashtra Energy Development Agency, Pune https://www.mahaurja.com


******

# महानिर्मितीचा १७वा वर्धापन दिन मुख्य सांघिक कार्यालय प्रकाशगड येथे उत्साहात साजरा

## "आधुनिक तंत्रज्ञान आणि संघटित कार्य यामुळे भविष्यातील आव्हाने पेलण्यास महानिर्मिती सक्षम"
## – अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती

'कोरोना काळात उद्धवलेले वैश्विक संकट, वाढलेली विजेची मागणी आणि देशभर असलेली कोळसा टंचाई इ. आव्हाने समर्थपणे पेलत महानिर्मितीने वीजनिर्मितीमध्ये विक्रमी कामगिरी साध्य केली आहे. या काळामध्ये महानिर्मितीच्या प्रत्येक घटकाने उत्तम कार्यसंस्कृती व नियोजनपूर्वक संघटित प्रयत्न यामुळे हे यश प्राप्त केले आहे. मात्र यापुढे भविष्यात येणाऱ्या आव्हानांना आपण सज्ज राहिले पाहिजे', असे आवाहन महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे यांनी केले. महानिर्मितीच्या १७व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात त्यांनी महानिर्मितीच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांशी मार्गदर्शनपर संवाद साधला. स्थापित क्षमता वाढविताना पर्यावरणीय दृष्टीकोनातून अपारंपारिक ऊर्जा निर्मितीबाबत महानिर्मितीने या वर्षी एकूण ७५ मेगावॅट क्षमतेचे ७ सौर प्रकल्प कार्यान्वित केले असून आणखी २,७६३ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणीचे कार्य प्रगतीपथावर असून ग्रीन हायड्रोजन तसेच पंप स्टोरेज जल विद्युत केंद्र उभारणीसाठी महानिर्मिती प्रयत्नशील असल्याचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनपर भाषणात व्यक्त केले.

महानिर्मितीच्या प्रकाशगड येथील मुख्य सांघिक कार्यालय येथे दि. ६ जून २०२२ महानिर्मितीचा १७वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (खनिकर्म) श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) श्री. संजय मारुडकर, महानिर्मितीचे सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते / मुख्य महाव्यवस्थापक तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते. विशेष म्हणजे राज्यातील विविध वीज केंद्रामधील मुख्य अभियंते, अधिकारी–कर्मचारी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सदर कार्यक्रमात सहभागी झाले होते.

यावेळी कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) श्री. नितीन वाघ यांचे मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाने तयार केलेल्या "रसायनशास्त्र" पुस्तिकेचे प्रकाशन तसेच महानिर्मितीच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या सुधारित व पुनर्रचना केलेल्या महानिर्मितीच्या संकेतस्थळाचे उद्घाटन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते करण्यात आले. भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार इंग्रजी व मराठीमध्ये असलेल्या या संकेतस्थळाची वैशिष्ट्ये कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदुरकर यांनी उपस्थितांना विषद केली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये विशेष उल्लेखनीय कार्य करणारे विभाग व तंत्रज्ञ यांना गौरविण्यात आले. यांत्रिकोत्तम, शक्तीपुंज, उत्कृष्ट गुणवत्ता मंडळ व विश्वकर्मा असे पुरस्कारांचे स्वरूप होते तर उत्कृष्ट कोळसा हाताळणीकरिता ब्लॅक डायमंड पुरस्कार प्रदान करण्यात आले. सन २०१८ ते २०२१ करिता घोषित झालेले पुरस्कार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते कार्यकारी संचालक श्री. अभय हरणे व कार्यकारी संचालक श्री. राजेश मोराळे यांनी कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वीकारले.

सदर कार्यक्रमात मार्गदर्शन करताना संचालक (संचलन) श्री. चंद्रकांत थोटवे यांनी महानिर्मिती कंपनीचा कर्मचारी आगामी काळातील प्रत्येक आवाहन पेलण्यास सिद्ध असल्याची ग्वाही दिली. तसेच स्थापना दिवसापासूनचा महानिर्मितीचा खडतर प्रवास विशद केला. यावेळी संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे यांनी ६ जून हा छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन व महानिर्मितीचा वर्धापन दिन एकाच दिवशी असल्याचे नमूद केले; तसेच कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी सर्वांनी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. वर्धापन दिन हा सिंहावलोकन करण्याचा दिवस असून नवीन संकल्प करण्याचा दिवस असल्याने प्रत्येक अधिकारी–कर्मचाऱ्याने महानिर्मिती प्रती आपल्या कर्तव्याचे पालन करावे, असे आवाहन संचालक (खनिकर्म) श्री. पुरुषोत्तम जाधव यांनी केले. तर संचालक (प्रकल्प) श्री. संजय मारुडकर यांनी महानिर्मितीच्या अनेक टप्प्यातील प्रगतीचा आलेख उलगडला. विपरीत परिस्थितीत अखंड वीजनिर्मिती साध्य करण्यासाठी आवश्यक निधीची पूर्तता करणेकरिता महानिर्मितीच्या वित्त विभागाने कुशल आर्थिक व्यवस्थापनातून कर्जांच्या पुनर्बांधणीसहित अनेक वित्तीय सुधारणा राबविल्याबद्दल संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे यांचा विशेष गौरव करण्यात आला. या प्रसंगी मुख्यालय येथील जनसंपर्क विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या "महानिर्मितीची यशोगाथा" या चित्रफितीचे प्रदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. भीमाशंकर मंता यांनी केले. याप्रसंगी मागील तीन वर्षातील महानिर्मितीच्या कामगिरीचा आढावा त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. पुरस्कार प्राप्त कार्यकारी अभियंता श्री. लहाने, भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र तसेच तंत्रज्ञ–१ श्री. एस.एन. राणे, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मनोगत व्यक्त करताना महानिर्मिती व्यवस्थापनाचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी तसेच पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचलन मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजुरकर यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. विलास हिरे, औद्योगिक संबंध अधिकारी यांनी केले. महानिर्मितीच्या राज्यभरातील अधिकारी–कर्मचारी ह्यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून प्रतिसाद देऊन या सोहळ्याला आपली उपस्थिती दर्शविली.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात महात्मा ज्योतिबा फुले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न











**Inauguration of Technician Induction Level KT-77 Batch for 40 Week at Koradi Training Centre, Koradi on dtd. 04/07/2022. Hon'ble Director (HR), Dr. Manvendra Ramteke graced as a Chief Guest.**

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात सार्वजनिक छत्रपती शिवाजीमहाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्साहात संपन्न





नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात सार्वजनिक छत्रपती शिवाजीमहाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती समितीने नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सदर जयंतीदिनी नाशिक औ.वि. केंद्रातील अधिकारी, अभियंते, कर्मचारी आणि वसाहतीतील रहिवाश्यांसाठी शैक्षणिक स्पर्धा, सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.





# महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (कोळसा) मा.श्री. राजू बुरडे यांचा सेवानिवृत्तीपर कार्यक्रम मुख्यालयात संपन्न







महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (कोळसा) मा.श्री. राजू बुरडे यांचा सेवानिवृत्तीपर कार्यक्रम मुख्यालय, मुंबई येथे संपन्न झाला. याप्रसंगी संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (मा.सं.) मा.डॉ. मानवेंद्र रामटेके, संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर आणि मुख्यालयातील मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक, वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.











## मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांची ६६० मेगावॅट क्षमतेच्या भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पास भेट





भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील विस्तारित ६६० मेगावॅट प्रकल्पास मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी भेट दिली. मे. भेलद्वारे उभारण्यात येणाऱ्या १२२ टन स्टीम टर्बाईनला आस्थापित करण्याचा शुभारंभ मा. ऊर्जामंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. सदर भेटीत मा. ऊर्जा मंत्री यांनी नियंत्रण कक्षाची सविस्तर माहिती घेतली आणि आढावा बैठक घेऊन अधिकारी-कर्मचाऱ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. त्यावेळी उपस्थित महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर, भुसावळ औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड व भुसावळ प्रकल्पाचे मुख्य अभियंता श्री. विवेक रोकडे आणि अन्य अधिकारी, कर्मचारीवृंद. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.







## मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांची नाशिक औष्णिक विद्युत केंद्रास भेट







नाशिक औष्णिक विद्युत केंद्रास मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी भेट दिली. सदर भेटीत मा. ऊर्जा मंत्री यांनी नियंत्रण कक्षाची सविस्तर माहिती घेतली आणि आढावा बैठक घेऊन अधिकारी-कर्मचाऱ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. त्यावेळी उपस्थित महानिर्मितीचे प्र. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-१) मा.श्री. राजेश मोराळे, नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. एन.एम. शिंदे आणि अन्य अधिकारी, कर्मचारीवृंद. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.







## महानिर्मितीचा १७वा वर्धापन दिन मुख्य सांघिक कार्यालय प्रकाशगड येथे उत्साहात संपन्न















**संपादक : महेश आफळे (जनसंपर्क अधिकारी)**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड,
दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ **(खाजगी वितरणासाठी)**

**E-mail :** promahagenco@gmail.com | promahagenco1@gmail.com
**Web :** www.mahagenco.in
Printed & Published by : Shri. Mahesh Aphale of
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.
**The Company accepts no responsibility for the matter published in the journal**